दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–३९ | सोमवार, दि. २ जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

**संपादकीय**

## ट्रम्प यांच्या बेलगाम टॅरिफ निर्णयाला वेसण !

मेरिकेच्या अध्यक्षपदावर आरूढ झाल्यानंतर जगावर टॅरिफचा वरवंटा फिरवणारे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना फेडरल कोर्टाने मोठा दणका दिला आहे. ट्रम्प यांच्या टैरिफ निर्णयाला अमेरिकेतील न्यूयॉर्कस्थित आंतरराष्ट्रीय व्यापार न्यायालयाने असंवैधानिक असल्याचे सांगून स्थगिती दिली आहे. ट्रम्प यांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केला असून राज्यघटनेच्या बाहेर जाऊन टॅरिफ लावण्याचा प्रयत्न केल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.

## व्यावसायिक गॅस सिलेंडर दरात २४ रुपयांनी स्वस्त

मुंबई: देशातील छोटी मोठी रेस्टॉरंट, हॉटेल आणि ढाबाचालकांसाठी दिलासा देणारी अपडेट समोर आली आहे. तेल कंपन्यांनी व्यावसायिक एलपीजी गॅस सिलेंडरचे दर २४ रूपयांनी कमी केले आहेत. आजपासून हे नवे दर लागू होणार आहेत. सलग दुसऱ्या महिन्यात व्यावसायिक वापराच्या सिलेंडरच्या दरात घसरण झाली आहे. मे महिन्यात देखील कंपन्यांनी १४.५० रूपयांची कपात केली होती. व्यावसायिक वापराच्या एलपीजी सिलेंडरच्या दरात घसरण किंवा वाढ झाल्यास त्याचा थेट परिणाम हॉटेल, रेस्टॉरंट आणि खाद्य व्यवसायावर होतो.

## थोडक्यात...

### कुंभमेळ्यासाठी ४ हजार कोटींच्या निविदा–फडणवीस

नाशिक –कुंभमेळा निमित्ताने ४ हजार कोटी रुपयांच्या निविदा काढल्या आहेत असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. अजून २ हजार कोटी रुपयांची निविदा काढण्यात येणार आहे. गोदावरी नदी स्वच्छ राहण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू झाले आहेत असेही फडणवीस यांनी सांगितले.

### अमोल मिटकरी हा छोटा माणूस चिल्लर माणूस– हाके

मुंबई–अमोल मिटकरी मी जर पाणीतोड असेल तर अजित दादा समुद्रतोड आहे अजितदादा नदीतोड आहे अजित दादा जलसिंचन तोड आहे अमोल मिटकरी तुझ्या या वक्तव्यावर मी व्यक्त होणार नाही. अजितदादा काय बोलला असेल तर मी व्यक्त होईल अशी प्रतिक्रिया ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी दिली. तसेच अमोल मिटकरी हा छोटा माणूस चिल्लर माणूस आहे असे देखील ते पुढे म्हणाले.

### कुंभमेळ्याच्या अमृत स्नानाच्या ताराखा जाहीर

नाशिक–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नियोजनाची बैठक घेतली. यामध्ये १३ आखाड्याचे प्रमुख साधू आणि कॅबिनेटमधील मंत्र्यांचा समावेश होता. नाशिकच्या जिल्हाधिकारी कार्यालयात याविषयीची बैठक झाली. या बैठकीत आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यातील अमृत स्नान, शाही स्नानच्या ताराखा जाहीर करण्यात आल्या आहेत.

### एचटीबीटी कपाशी बियाण्याची तस्करी

अमरावती– ट्रॅव्हल्स मधून प्रतिबंधित एचटीबीटी कपाशी बियाण्याची तस्करी केल्याचे उघड झाले आहे. २५०० पाकिटे प्रिंट केलेले चार कट्टे जप्त करण्यात आले. एकूण २५ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आले. खरीप हंगामाच्या तोंडावर आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई करण्यात आली आहे.

### कांद्याच्या किंमती भडकणार?

नाशिक–मुसळधार पावसात कांदा खराब झाल्याने येत्या काळात बाजारात कांद्याचा तुटवडा होऊन किंमत वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. गेल्या वर्षी पण पावसाने कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले होते. त्यामुळे किंमती वधारल्या होत्या. यावेळी सुद्धा तशीच स्थिती असल्याने भाव वधारण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

### सीएनजीच्या किंमतीत आजपासून वाढ

मुंबई–मुंबई आणि एमएमआर राज्यांमध्ये सीएनजीच्या किंमतीत आजपासून वाढ होणार आहे. प्रतिकिलो मागे पैशांनी वाढ झाली आहे. या दरवाढीमुळे मुंबई, ठाणे आणि एमएमआरच्या इतर भागात सीएनजीची सुधारित किंमत ८० रुपये प्रति किलो झाली आहे. गेल्या काही महिन्यांतील ही चौथी दरवाढ आहे.

# डीएपी खताचा तुटवडा; १७ टक्केच शिल्लक

## शेतकऱ्यांची चिंता वाढली, पर्यायी खत वापरण्याचा सल्ला

**पुणे । प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर मागणी असलेल्या डीएपी (डायमोनियम फॉस्फेट) खताची आयात सध्या भारतीय खत कंपन्यांसाठी आर्थिकदृष्ट्या परवडण्याजोगी नाही, ज्यामुळे या खताचा तुटवडा गंभीर स्वरूपाला आला आहे. महाराष्ट्रातील अनेक भागांत डीएपी खताची कमतरता जाणवत आहे. राज्यात सुमारे साडेपाच लाख मेट्रिक टन डीएपीची मागणी असताना, २९ मे २०२५ पर्यंत केवळ ९४ हजार मेट्रिक टनच खत उपलब्ध होता, म्हणजेच उपलब्धता फक्त मागणीच्या १७**



**टक्क्यांपर्यंत मर्यादित आहे. त्यामुळे शेतकरी आणि खत उत्पादकांमध्ये चिंता वाढली आहे.**

पावसाळी हंगाम सुरू होत असल्यामुळे पिकांची खरीप पेरणी जोरात सुरू होणार आहे. या काळात जमिनीत पुरेशा प्रमाणात वापसा होत असल्यामुळे युरिया, डीएपीसारख्या प्रमुख खतांची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढते. सध्या राज्यात युरियाची मुबलक उपलब्धता असून शेतकऱ्यांना तोडगा म्हणून युरिया खताचा पुरवठा केला जात आहे, पण डीएपीची कमतरता कडे दुर्लक्ष करता येणार नाही. डीएपी आयातीसाठी भारतीय खत कंपन्यांना आर्थिक अडचणी येत आहेत. त्याचे मुख्य कारण म्हणजे या खताचा उत्पादन खर्च आणि त्याची विक्री किंमत यामध्ये मोठी तफावत आहे. डीएपीच्या एका बॅगची बाजारात किंमत सुमारे २४४५ रुपये आहे, पण शेतकऱ्यांना त्याची विक्री सुमारे १३५० रुपयांना केली जाते. या विक्री किमतीवर केंद्र सरकार प्रति बॅग १०२५ रुपये अनुदान म्हणून देत असले तरी, उत्पादनाचा खर्च सुमारे ३००० रुपयांच्या आसपास असल्यामुळे खत कंपन्यांना मोठा तोटा सहन करावा लागतो. त्यामुळे त्यांना आयात करणे परवडत नाही आणि त्यांनी खत उत्पादनावर वायदा मोडला आहे. या परिस्थितीमुळे राज्यातील खत पुरवठा व्यवस्थापन अधिक कठीण झाले आहे. २०२२ ते २०२४ या काळात राज्यात सरासरी ◀◀ पान २ वर

# डिजिटल अरेस्टच्या नावे शिक्षिकेला भामट्याकडून ८३ लाखांना गंडा

## आंबाजोगाई येथील प्रकार; विश्वास नांगरे पाटील यांचे नाव घेत फसवणुक

**आंबाजोगाई । प्रतिनिधी**

**येथील एक धक्कादायक घटना उघडकीस आली असून, एका सेवानिवृत्त शिक्षिकेला व्हॉट्सअॅप कॉलवरून 'डिजिटल अरेस्ट' केल्याचा प्रकार घडला आहे. सेवानिवृत्त शिक्षिकेला मनी लॉन्ड्रींग आणि अतिरेक्यांना फंडिंग केल्याचे सांगत तब्बल ८३ लाख रुपयांना गंडवण्यात आले आहे. चौकशीला सहकार्य करा सांगत फसवणूक करणाऱ्या भामट्यांनी विश्वास नांगरे पाटील यांचे नाव घेत**



**ही फसवणूक केली आहे.**

अंबाजोगाई येथील सेवानिवृत्त शिक्षिकेला मनी लॉन्ड्रीग आणि अतिरेक्यांना फंडिंग केल्याचे सांगत चौकशीला सहकार्य करा असे म्हणत व्हॉट्सअॅप कॉल वरून तब्बल ८३ लाख रुपये हडपल्याचा प्रकार अंबाजोगाईत उघडकीस आला आहे. तुमच्या आधार कार्ड वरून दुसरे सिम कार्ड घेतले असून त्याचा दुरुपयोग झाल्याचे देखील बनावट कॉलद्वारे ◀◀ पान २ वर

### सोने, प्लॉट गहाण ठेवून दिले पैसे

विशेष बाब म्हणजे निवृत्त शिक्षकेने भीतीपोटी सोने, प्लॉट गहाण ठेवून त्यावर कर्ज काढत ही रक्कम दिल्याचे सेवानिवृत्त शिक्षिकेने सांगितले.

# रात्री तोल जाऊन पडणाऱ्यांना महत्व देत नाही!

## सुनिल तटकरे यांचे हाके यांना खोचक प्रत्युत्तर



**ठाणे । प्रतिनिधी**

**गेल्या काही दिवसांपासून सातत्याने अजित पवारांवर आरोप करणाऱ्या लक्ष्मण हाकेंना आता राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंनी एका वाक्यात खोचक उत्तर दिले आहे. ज्या माणसाचा रात्री चालताना तोल जातो, त्याला कुठे महत्व देता, असे सुनील तटकरे म्हणाले. हाके, डाके, पडळकर अशा लोकांना महाराष्ट्र फार काही महत्व देत नाही.**

अजित पवारांनी ओबीसींचा निधी अडवला, अर्थखात्याला ते चिकटून बसलेत अशी टीका लक्ष्मण हाके यांनी केली होती. आपण बोलायला लागलो तर अजित पवारांचे कपडेही राहणार नाहीत असा इशाराही त्यांनी दिला होता. त्यानंतर सुनील तटकरेंनी त्यांना आता उत्तर दिले आहे. सुनील तटकरे म्हणाले की, ज्या माणसाचा रात्री चालताना तोल जातो त्याला कशाला महत्व द्यायचे. राज्याचे प्रमुख हे शेवटी मुख्यमंत्री असतात आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले की कुठल्याही प्रकारचा निधी हा दुसऱ्या ◀◀ पान २ वर

# ईशान्य भारताला पावसाचा तडाखा, पुरासह भूस्खलन बळींची संख्या २६


**नवी दिल्ली । वृतसंस्था**

ईशान्य भारतातील राज्यांमध्ये सलग दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे भूस्खलन आणि पूरात २६ जणांचा मृत्यू झाला आहे. मिझोराममध्ये भूस्खलन होऊन १३ घरे कोसळली तर सिक्कीममध्ये १५०० पर्यटक अडकले असून, पूरबाधित राज्यांमध्ये युद्धपातळीवर मदतकार्य सुरु आहे.

ईशान्य भारतातील आसाम, अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोराम आणि त्रिपुरा राज्यांमध्ये मुसळधार पाऊस, पूर आणि भूस्खलनामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. तीन राज्यांत मागील दोन दिवसांमध्ये २६ हून अधिक जणांचा मृत्यू झाला आहे. आसाममध्ये भूस्खलन आणि पुरामुळे १६ जणांचा मृत्यू झाला आहे. ◀◀ पान २ वर

# देशात कोरोनामुळे दोन दिवसांत २१ मृत्यू

## नागरिकांची चिंता वाढली; सक्रिय रुग्णांची संख्या ३७८३



**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र आणि केरळमध्ये सर्वाधिक ७ जणांचा मृत्यू झाला आहे. तर दोन दिवसात कोरोनामुळे देशात २१ मृत्यू झालेला आहे. त्यामुळे नागरिकांची चिंता वाढली आहे.**

### महाराष्ट्रात ९ हजारांहून अधिक कोविड चाचण्या

महाराष्ट्रात शनिवारी कोविडचे ६८ नवीन रुग्ण आढळले. जानेवारी २०२५ पासून मुंबईत एकूण ७४९ रुग्ण आढळले आहेत. जानेवारीपासून राज्यात ९५९२ कोविड–१९ चाचण्या घेण्यात आल्या आहेत. त्याच वेळी, गुरुवारी जम्मू आणि काश्मीरमध्ये कोविडचे दोन रुग्ण आढळले. दोन्ही रुग्ण केरळचे आहेत आणि श्रीनगरमधील सरकारी दंत महाविद्यालयात शिकत आहेत.

देशात कोरोना विषाणूचे रुग्ण झपाट्याने वाढत आहेत. सक्रिय रुग्णांची संख्या ३७८३ वर पोहोचली आहे. केरळमध्ये सर्वाधिक १४०० रुग्ण आहेत. महाराष्ट्रात ४८५ आणि दिल्लीत ४३६ सक्रिय रुग्ण आहेत. गेल्या ४८ तासांत १००० हून अधिक नवीन रुग्णांची नोंद झाली आहे. आरोग्य ◀◀ पान २ वर


## दोन्ही पवारांची एकत्र बैठक

पुणे । प्रतिनिधी

येथील रविवारच्या बैठकीत अजित पवार आणि जयंत पाटील शरद पवारांच्या बाजूला बसले होते. तर या बैठकीनंतर दोन्ही पवारांमध्ये अनौपचारिक चर्चा झाल्याचे म्हटले जात आहे. या बैठकीत बाळासाहेब थोरात, हर्षवर्धन पाटील, राजेश टोपे, दिलीप वळसे पाटील उपस्थित होते.

# बडतर्फ पोलीस अधिकारी रणजीत कासले पुन्हा अटकेत

## मुंबई पोलिसांनी दिल्लीतून घेतले ताब्यात ; नेत्यांची पोलखोल करणे भोवले



**मुंबई । प्रतिनिधी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्येनंतर बीड जिल्ह्यातील पोलिसांचे एक एक कारनामे समोर आले. त्यात बडतर्फ पोलीस अधिकारी रणजीत कासले यांच्या वक्तव्यांनी तर पोलीस खात्याची लक्तरं वेशीवर टांगली. त्यांनी अनेक धक्कादायक दावे केले. बीड कारागृहात असताना त्यांनी वाल्मीक कराड याला चिकण, मटण आणि सर्व सोयीसुविधा देण्यात येत असल्याचा दावा केला होता. ◀◀ पान २ वर

# कृषीमंत्र्यांना घरी बसवून प्रश्न मिटणार आहे का?

## वादग्रस्त विधानानंतर, कोकाटेंचा विरोधकांना सवाल



**नाशिक । प्रतिनिधी**

**मी बोललो त्याचा चुकीचा अर्थ काढला गेला. मला फक्त एवढेच वाटते की राज्यात शेती अडचणीत आहे. शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्न करत आहे, हाच आमचा हेतु आहे, असे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी म्हटले आहे. तसेच कृषीमंत्र्यांना घरी बसवून प्रश्न मिटणार आहेत का? असा सवाल त्यांनी विरोधकांसमोर उपस्थित केला आहे.**

मंत्री कोकाटे यांच्याकडून सातत्याने शेती आणि शेतकऱ्यांविषयी वादग्रस्त वक्तव्य केले जात आहेत. नुकत्याच नाशिकच्या दौऱ्यावर असताना देखील नुकसानग्रस्त पिकांची पाहणी करताना कोकाटे यांनी असेच एक वादग्रस्त विधान केलेले होते. अधिकारी उभ्या पिकाचे पंचनामे करत असल्याची तक्रार एका शेतकऱ्याने कोकाटे यांच्याकडे केली होती. त्यावर कोकाटे यांनी कापणी केलेल्या पिकांचे पंचनामे करून ◀◀ पान २ वर

### हे मला जास्त महागात पडतंय–अजित पवार



काही गोष्टी या मनात ठेवायच्या असतात, असा सल्ला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना दिला आहे. कोकाटे यांना अजून गोष्टी मनात ठेवायची सवय नाही, आता मला जास्त महागात पडतंय असेही यावेळी अजितदादांनी म्हटले आहे.

# मंत्री संजय राठोड यांनी घेतली ऊसतोड कामगारांच्या कुटुंबाची भेट

## वारोळा येथे मयताच्या कुटुंबांना सानुग्रह अनुदान वाटप



**बीड । पतिनिधी**

**माजलगाव तालुक्यातील वारोळा (आश्रमशाळा तांडा) येथे नुकत्याच झालेल्या अपघातात मृत्यू झालेल्या ऊसतोड कामगारांच्या कुटुंबियांची मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी सांत्वनपर भेट घेतली व शासनामार्फत श्रीमती** ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३० मे २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २३.५० क्विंटल | २,४०१ | २,७४१ | २,६१० |
| ज्वारी/हायब्रिड: ३३.५० क्विंटल | २,००० | २,६०० | २,३०२ |
| मका/लोकल:३३.५०क्विंटल | ५,३०१ | ६,७०० | ६,४१७ |
| तूर : १९.५० क्विंटल | ६,५०० | ६,५२६ | ६,५०६ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ३३.०० क्विंटल | २,००० | २,६०० | २,३८६ |
| मुग :०.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| सोयाबीन: १६.५० क्विंटल | ४,२०० | ४,२०० | ४,२०० |
| हरभरा: १.५० क्विंटल | ५,४०० | ५,४०१ | ५,४०० |

## अग्रलेख

# ट्रम्प यांच्या बेलगाम टॅरिफ निर्णयाला वेसण !

मेरिकेच्या अध्यक्षपदावर आरूढ झाल्यानंतर जगावर टॅरिफचा वरवंटा फिरवणारे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना फेडरल कोर्टाने मोठा दणका दिला आहे. ट्रम्प यांच्या टैरिफ निर्णयाला अमेरिकेतील न्यूयॉर्कस्थित आंतरराष्ट्रीय व्यापार न्यायालयाने असंवैधानिक असल्याचे सांगून स्थगिती दिली आहे. ट्रम्प यांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केला असून राज्यघटनेच्या बाहेर जाऊन टॅरिफ लावण्याचा प्रयत्न केल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. अमेरिकेतील न्यायालयाच्या निर्णयामुळे जगाला दिलासा मिळाला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी आणीबाणीच्या काळातील अधिकाराचा वापर करून जाहीर केलेले कर धोरण लागू करण्यास आंतरराष्ट्रीय व्यापार न्यायालयाने मनाई केली आहे. ट्रम्प यांच्या निर्णयामुळे जागतिक शेअर बाजारावर परिणाम झाला होता आणि महागाई वाढण्याचा धोकाही निर्माण झाला होता. या निर्णयाला ट्रम्प प्रशासन वरिष्ठ न्यायालयात आव्हान देऊ शकते.

कोर्टाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने म्हटले की, ट्रम्प यांनी आपत्कालीन आर्थिक अधिकार कायद्याचा गैरवापर केला. हा कायदा अध्यक्षांना आपत्कालीन काळात खास अधिकार देतो. पण ट्रम्प यांनी कोणत्याही ठोस कारणाशिवाय त्याचा वापर केला. ट्रम्प व्यापार कायदा १९७४ च्या कलम १२२ नुसार १५० दिवसांत १५ टक्के टॅरिफ लावू शकतात. मात्र, त्यासाठी ठोस कारण पाहिजे असे न्यायालय म्हणाले. ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे जागतिक व्यापारात ८१ टक्के घट होऊ शकते, असे जागतिक व्यापार संघटनेने यापूर्वीच म्हटले होते. अध्यक्ष ट्रम्प यांनी २ एप्रिल रोजी जगातील अनेक देशांवर टॅरिफ लावला होता. या टॅरिफला आव्हान देणाऱ्या ७ याचिका कोर्टात दाखल झाल्या होत्या. या टॅरिफमुळे अमेरिकन अर्थव्यवस्था मजबूत होईल तसेच अमेरिकेकडून कमी सामान खरेदी करणाऱ्या देशांना धडा शिकवू असेही ट्रम्प म्हणाले होते. मात्र, चीन वगळता त्यांनी अन्य देशांवर ९० दिवसांसाठी टॅरिफला स्थगिती दिली होती. ट्रम्प यांनी चीनवर १४५ टक्के टॅरिफ लावला होता. त्याला जशास तसे उत्तर म्हणून चीननेही अमेरिकेवर टॅरिफ लावला होता. अखेर चर्चेनंतर दोन्ही देशांनी टॅरिफ कमी केला होता.

परदेशातील वस्तूंवर आयात शुल्क वाढवून स्थानिक उत्पादनक्षमतेला चालना मिळेल असा ट्रम्प यांचा अंदाज होता. अमेरिकेला हितकारक ठरतील असे व्यापारी करार इतर देशांनी करावेत यासाठी आयातशुल्क धोरणाचा वापर ट्रम्प यांनी केला. अमेरिकेच्या अध्यक्षांचे निकटवर्तीय उद्योगपती एलॉन मस्क यांनी ट्रम्प प्रशासनाला रामराम ठोकला आहे. त्यांनी डीओजीई या खात्याच्या प्रमुखपदाचा राजीनामा दिल्याची घोषणा एक्सवर केली. ट्रम्प यांनी आणलेल्या बिग ब्युटिफूल बिलला मस्क यांचा विरोध होता. डीजीओईचे काम वायफळ खर्चात कपात करणे आहे आणि हे विधेयक त्याच्या विरोधात आहे असे मस्क यांचे म्हणणे होते. अमेरिकेच्या सरकारी खर्चात कपात करण्यासाठी मस्क यांनी उचललेल्या पावलांमुळे सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजी होती. मस्क हे पदभार स्वीकारल्यानंतर सरकारी नोकऱ्यांमध्ये हजारो ले-ऑफ कर्मचारी कपात आदी कारणांवरून चर्चेत होते. डोनाल्ड ट्रम्प यांनी सभागृहात मंजूर केलेल्या महत्त्वाकांक्षी करसवलतीच्या विधेयकावर (बिग ब्युटिफूल बिल) मस्क यांनी टीका केली होती. या विधेयकात करसवलत आणि स्थलांतरितांसाठी कायद्यांच्या अंमलबजावणीची तरतूद होती. या विधेयकाच्या मंजुरीमुळे खर्च वाढणार असल्याचे मस्क यांचे मत होते. ट्रम्प यांनी जगभरातल्या देशांवर वेगवेगळ्या प्रमाणात टॅरिफ लागू केले. त्यामुळे बऱ्याच देशांशी अमेरिकेचे संबंध तणावपूर्व झाले. अमेरिकन नागरिकांचे आयुष्य अधिक सुखकर करण्यासाठी टॅरिफ लागू करत असल्याचा दावा ट्रम्प यांनी केला होता.

अमेरिकेच्या न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे ट्रम्प प्रशासनाला मोठा धक्का बसला आहे. ट्रम्प यांनी बऱ्याचवेळा आक्रमक भूमिका घेत टॅरिफ निर्णयाचे समर्थन केले होते. त्यांच्या निर्णयावर जगभरातील अनेक देशांनी आक्षेप घेतला होता. पण ट्रम्प टैरिफ लागू करण्याच्या निर्णयापासून माघार घ्यायला तयार नव्हते. आता न्यायालयानेच ट्रम्प यांच्या निर्णयाला स्थगिती दिल्याने ट्रम्प यांच्यासमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. ट्रम्प यांच्या टॅरिफ लागू करण्याच्या निर्णयावर ताशेरे ओढताना अमेरिकन न्यायालयाने हे घटनाविरोधी कृत्य ठरवले. अमेरिकन सरकारने न्यायालयात बाजू मांडताना ट्रम्प यांच्या निर्णयाची भलामण केली. ट्रम्प यांच्या निर्णयामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर तडजोडीच्या चर्चा सुरू आहेत. त्यामुळे यात कोणत्याही न्यायालयीन आदेशामुळे अडसर आला तर अमेरिकेची प्रतिमा जागतिक स्तरावर खालावेल. न्यायालयीन मध्यस्थीमुळे अध्यक्षांचे हात बांधले जातील असा युक्तिवाद ट्रम्प प्रशासनाने केला. मात्र न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळला. फक्त राजकीय कारणांसाठी हे न्यायालय राष्ट्राध्यक्षांना असे अधिकार वापरू देऊ शकत नाही. ते वापरण्याची त्यांना परवानगी नाही अशा स्पष्ट शब्दांत न्या. जेन रेस्टॉनी यांनी ट्रम्प सरकारला फटकारले आहे.

# माजी नगराध्यक्ष काकासाहेब कटारे यांचा भाजपात प्रवेश

**अंबड । प्रतिनिधी**

**अंबड बदनापूर मतदारसंघाचे आमदार तथा भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे यांचे नेतृत्व स्वीकारून त्यांच्या उपस्थितीत अंबडचे राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार) गटाचे माजी नगराध्यक्ष काकासाहेब कटारे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे.**



दरम्यान प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांमध्ये अंबडनगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष काकासाहेब कटारे, बाबासाहेब कटारे, चंद्रकांत लाड, नारायण वाघमारे, विष्णू धुळे, रामेश्वर कटारे, हारी भाऊ पिराने, गणेश पिराने, मंगेश भिसे, प्रदीप गरड, अंकुश गाडेकर, अरुण खरात, अखिल भाई, आदिल भाई, व्यंकटेश कटारे, वैजनाथ चव्हाण, बंडू काळबांडे, विजय राजपूत,यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) गटाला राम राम करून सोडचिठ्ठी देत आ.नारायण कुचे यांच्या उपस्थितीत अंबड येथील भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात जाहीर प्रवेश केला आहे. यावेळी मा. नगराध्यक्ष काकासाहेब कटारे यांना विचारले असता प्रवेश का केला ते म्हणाले की माझी वैयक्तिक कारणामुळे मी भाजपमध्ये प्रवेश करीत आहे आज पर्यंत राजकारणामध्ये कोणत्याही लोकप्रतिनिधीवर मी नाराज नसून सखुशीने मी भाजप पक्षात प्रवेश करीत आहे असे माजी नगराध्यक्ष काकासाहेब कटारे यांनी बोलताना सांगितले. प्रवेश दरम्यान यावेळी दीपकसिंह ठाकूर, देविदास कुचे, प्रदीप पवार, फेरोज शेख, कृष्णा पाटील जिगे, सुरेश गुडे, संदीप खरात, विठ्ठल राणा, डॉ. नंदकिशोर पिंगळे, बाळू उर्फ शाहुल खरात, अंबादास जाधव, संजय जाधव, पांडुरंग शिंदे, संजय राठोड, गंगाधर वराडे, बळीराम राऊत, नसिर बागवान यांच्यासह भाजपाचे अनेक प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# एसएफआयच्या १९ व्या महाराष्ट्र राज्य अधिवेशनास आजपासून नांदगाव खंडेश्वर येथे सुरुवात

**बीड । प्रतिनिधी**

**स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय)चे वे१९ तीन दिवसीय महाराष्ट्र राज्य अधिवेशन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि संत गाडगे महाराज यांची जन्म व कर्मभूमी असलेल्या नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती येथे संपन्न होणार आहे. या अधिवेशनाच्या निमित्ताने आज, २ जून २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.**

या सभेसाठी एसएफआयचे अखिल भारतीय अध्यक्ष व्ही. पी. सानू, महासचिव मयुख बिस्वास, डहाणू विधानसभेचे आमदार कॉ. विनोद निकोले, शेतकरी नेते डॉ. अजित नवले, एसएफआयचे राज्य अध्यक्ष सोमनाथ निर्मळ आणि सचिव रोहिदास जाधव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. बीड जिल्ह्यातून मोठ्या संख्येने विद्यार्थी या अधिवेशनात सहभागी होत आहेत. या जाहीर सभेसाठी विद्यार्थी, पालक व शिक्षणप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन एसएफआयच्या वतीने करण्यात आले आहे.




एसएफआय ही देशातील सर्वात मोठी विद्यार्थी संघटना आहे. स्थापनेपासूनच एसएफआयने शिक्षणातील विविध प्रश्नांवर देशभरात आंदोलनांची लढाई उभी केली आहे. सर्वांना समान, मोफत, दर्जेदार आणि रोजगाराभिमुख शिक्षण मिळावे, तसेच विद्यार्थी वर्गाचे हक्क व अधिकार सुरक्षित राहावेत, यासाठी एसएफआयने कायमच संघर्ष केला आहे. सरकारी शाळा बंद करण्याचे धोरण रद्द करणे, नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण रद्द करणे, शैक्षणिक संस्थांमधील लोकशाही बळकट करणे,शिक्षण, रोजगार आणि विकास यांच्यातील समन्वय साधणारे धोरण राबवणे, त्रिभाषा सूत्र आणि हिंदी सक्तीविरोधातील भूमिका या व अन्य विद्यार्थी प्रश्नांवर आगामी काळातील संघटनेची नियोजन करण्यात येणार आहे. या अधिवेशनात वरील शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि संघटनात्मक मुद्द्यांवर सखोल चर्चा व विचारमंथन करण्यात येणार आहे. अधिवेशनात आगामी काळातील कामाचा आराखडा निश्चित केला जाईल आणि काही महत्त्वाचे ठराव मांडले जातील. राज्यभरातून ३०० हून अधिक विद्यार्थी प्रतिनिधी या अधिवेशनात सहभागी होत आहेत. बीड जिल्ह्यातूनही विद्यार्थी प्रतिनिधींचा उत्स्फूर्त सहभाग असल्याची माहिती एसएफआयचे राज्य सहसचिव लहू खारगे, राज्य सचिवमंडळ सदस्य संतोष जाधव, राज्य उपाध्यक्ष व जिल्हाध्यक्ष सत्यजित मस्के, जिल्हा सचिव पवन चिंचाने, राज्य कमिटी सदस्य अंकुश कोकाटे यांनी दिली आहे.

# माहोऱ्यात दोनशे गोण्या बोगस डिएपी खत जप्त

## तिघांविरूध्द गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी नगर येथील कृषी अधिकारी पथकाची कारवाई जालना जिल्ह्यातील जाफ्राबाद तालुक्यातील माहोरा येथील माऊली ट्रेडर्स या खताच्या दुकानावर काल रात्री गुणनियंत्रण पथकाने कारवाई करून तब्बल २०० गोण्या - बोगस डिएपी खत जप्त केले आहे. छत्रपती संभाजीनगर येथील विशेष तंत्र अधिकारी गुणनियंत्रण श्री. आशिष काळूसे, जिल्हा कृषी अधिकारी विशाल गायकवाड आणि निलेशकुमार भदाने यांच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली. जालना जिल्हा कृषी अधिकारी पथकाला जालना जिल्ह्यात बोगस खत येतो कुठून ते दिसत नाही का असे बोलल्या जात आहेत. यामुळे जालना जिल्हाकृषी अधिकारी याप्रकरणी दुर्लक्ष का करतात अशी चर्चा आहे. जिल्हा कृषी अधीक्षक व कृषी दुकानदार यांच्या संगणमताने बोगस खत जिल्ह्यामध्ये येत असल्याचे बोलल्या जात आहे. यामुळे छत्रपती संभाजी नगर येथील अधिकाऱ्यांना कारवाई करण्याची वेळ आली आहे. काही दिवसांपूर्वी जिल्हा कृषी अधिकाऱ्यांनी पथकाने बोगस खताच्या प्रकरणी कारवाई केली होती परंतु पुढे काय झालं त्याचा तपास होऊ शकला नाही.मधुसूदन सरोदे संचालक असलेल्या माऊली ट्रेडर्स खताच्या दुकानावर छापा मारून तब्बल १० टन बोगस खतांचा साठा जप्त करण्यात आला. जवळपास २ लाख ७० हजार रूपये किंमतीचा हा साठा असून यासंदर्भात जाफ्राबाद सरोदे, मध्यप्रदेशातील खंडवा पोलीस ठाण्यात माऊली ट्रेडर्सचे येथील भोलेनाथ रामेश्वरठा संचालक केशवराव एकनाथ चाछरिया आणि खरगोन मध्यप्रदेश येथील उज्वल अ‍ॅग्रो कॅमिकल अ‍ॅन्ड फर्टिलायझर या तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धाड रोड परिसरात असलेल्या माऊली ट्रेडर्स या खताच्या दुकानावर अधिकाऱ्यांनी छापा टाकुन खताचा साठा तपासणी करण्यासाठी इ पॉश मशीनवरून खतसाठ्याची प्रत काढण्यास सांगितले. मात्र, तांत्रिक अडचणीमुळे श्री. सरोदे हे प्रत देऊ शकले नाही. त्यानंतर अधिकाऱ्यांनी दुकानाच्या मागील बाजूस असलेल्या पत्र्याच्या गोदामाची पाहणी केली परंतु तेथे संशयित बनावट डिएपी खत आढळून न आल्याने श्री. सरोदे यांना विचारपूस केली असता त्यांनी सदरचा खताचा साठा रमेश भुजंगराव लहान यांच्याकडून भाड्याने घेतलेल्या जीनरोड माहोरा येथील गोदामात ठेवल्याचे कबुल केले. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी तेथे जाऊन या बनावट खताचा साठा पंचनामा करून जप्त केला.

## अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण प्रजेच्या सुखासाठी वेचला-डॉ.वनवे

बीड। प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राज्यकर्ता म्हणून जनकल्याचा विचार सातत्याने करून त्यांनी विकासाची नवी दिशा प्रजेला दिली. प्रजेच्या हितासाठी अन्न,पिण्याचे पाणी, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांची पूर्ती व्हावी म्हणून अन्नछत्रे, विहिरींचे बांधकाम, धर्मशाळा,आश्रम शाळा, इत्यादींची निर्मिती केली. गोरगरिबांना सरळ हाताने त्या अन्नदान करीत असत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावरील काही उदाहरणे देत वामा लढाई सन्मानाची या मराठी चित्रपटाचे प्रमुख कलाकार बीड जिल्ह्याचे सुपुत्र डॉ. महेश वनवे पुढे म्हणाले की वर्तमान व्यवस्थेत पुष्कळ जन आपल्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक वेदना दुःख दैना झेलत संघर्षमय जीवन जगत आहेत. आपण देखील आपले स्वतःचे आत्म परीक्षण करून जनतेशी बांधिलकी म्हणून वंचित बेघर यांना मदतीचा हात पुढे केला पाहिजे. यावेळी जिव्हाळा केंद्रातील बालकांना कपडे व निराधारांना गोड जेवणासाठी आर्थिक मदत त्यांनी जीव्हाळा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य यांच्याकडे लगेच दिली.याबाबत अधिक माहिती अशी की,'जिव्हाळा' केंद्राने सिने कलावंत डॉ.महेशकुमार वनवे यांचा सत्कार व राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन केले होते. प्रथम राजमातेस निमंत्रितांनी विनम्रपणे अभिवादन केले. काकडहिरा गावच्या आदर्श सरपंच प्रिती बागलाने,छाया सरोदे,माया चव्हाण यांनी प्रतिमेस पुष्प हार अर्पण केला. मातृभूमी प्रतिष्ठान च्या वतीने अध्यक्ष ,सामाजिक कार्यकर्ते डॉ संजय तांदळे यांनी प्रमाणपत्र देवुन महेशकुमार वनवे यांचा सन्मान केला. तत्कालीन प्रथेप्रमाणे सती न जाता,अहिल्यादेवीने शौर्य-कर्तबगारी-जबाबदारी ने २९ वर्ष लोककल्याण कारी राज्यकारभार केल्याचे ,आपल्या मनोगता मधून प्राचार्य डी जी तांदळे यांनी मांडणी केली. से नि मुख्याध्यापक मस्के यांनी काव्य गायनाविष्कार सुंदर प्रस्तुत केला. अध्यक्ष स्थानी प्राचार्य डी जी तांदळे,तर प्रमुख अतिथी सरपंच प्रिती बागलाने,से नि अभियंता कांचन गायकवाड, सौ गायकवाड,बीड शहर बचाव मंच चे निमंत्रक नितीन जायभाये,मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ संजय तांदळे,लेक लाडकी अभियानचे बाजीराव ढाकणे होते. कार्यक्रमाचे व्यवस्थापन छाया सरवदे, प्रास्ताविक व सूत्रसंचालन केंद्राचे व्यवस्थापक राजू वंजारे यांनी तर निमंत्रितांचे आभार संचालक अभिजित वैद्य यांनी मानले . कार्यक्रमास लाभार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# राजकारणामुळे बाळानगरात घाणीचे साम्राज्य

**अंबड । पतिनिधी**

शहरातील बाळानगरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. सदरील बाळा नगरामध्ये पाहणी केली असता सदरील भागात काही नागरिकांनी नाल्या दाबल्यामुळे नालीतील पाणी रस्त्यावर येत आहे तसेच चेंबर चे काम चांगले झाले नसल्यामुळे ही परिस्थिती बाळाला नगरामध्ये झाली असल्याचे सांगण्यात येत आहे. सदरील प्रकरणी बाळा नगरा मधील प्रश्न निकाली काढण्यात येईल असे पत्र नगरपालिका कडून देण्यात येत आहे परंतु पत्र घेण्यास उपोषण करते नकार देत आहे असे कर्मचाऱ्याकडून सांगण्यात येत आहे. परंतु खरी परिस्थिती अशी आहे की बाळा नगारांमधील समस्या सोडण्यासाठी तीन ते चार महिने चा कालावधी लागू शकतो असे दिसून येत आहे. परंतु बाळा नगरातील नागरिकांनी तीन महिन्यापूर्वी निवेदन देऊनही पालिका प्रशासनाकडून सतत कानाडोळा केला जात आहे असे पण बोलल्या जात आहे. नैसर्गिक पावसामुळे जास्त पाऊस पडल्यामुळे पाणी रस्त्यावर येऊन नागरिकांचे घरासमोर समस्या वाढल्या. यामुळे आनंद मघाडे यांनी उपोषण सुरू केले आहे सदरील उपोषण२८ मे पासून सुरू केले. दरम्यान, १ जून रोजी पाचवा दिवशीही उपोषण चा आहे. याप्रकरणी नगरपालिकाच्या कर्मचाऱ्यांना विचारले असता ते म्हणाले की आम्ही पत्र घेऊन गेलो असता संबंधित उपोषण करते पत्र घेण्यास नकार देत आहे असे सांगण्यात येत आहे. सदरील पत्र पालिकेचे स्वच्छता निरीक्षक परमेश्वर शिंदे यांनी पालिकेच्या वतीने घेऊन गेले होते मात्र, पत्र घेण्यास नकार दिला असे सांगण्यात येत आहे. उपोषण करते आनंद मघाडे यांच्या प्रकृतीकडे डॉक्टर यांच्याकडून वेळोवेळी तपासणी केल्या जात आहे असे पण डॉक्टरांकडून सांगण्यात येत आहे. प्रत्यक्ष मुख्याधिकारी श्री उकिर्डे यांनी भेट देऊन आमच्या समस्यांचे प्रश्न त्वरित निकाली काढावे अशी मागणी उपोषणकर्त्याची आहे. जोपर्यंत मुख्याधिकारी उपोषण स्थळी येणार नाही तोपर्यंत उपोषण सोडणार नाही असे पण बोलल्या जात आहे.



## पान १ वरून...

### डीएपी खताचा तुटवडा;

४.५१ लाख मेट्रिक टन डीएपीचा वापर होतो, तर एकूण खतांचा वापर सुमारे ४२.१८ लाख टन आहे. यंदा खत उत्पादनाचे नियोजन ४६.८२ लाख मेट्रिक टन इतके ठेवण्यात आले आहे, पण डीएपीचा तुटवडा आढळल्याने योजनेची पूर्तता होणं शक्य नाही. शेतकऱ्यांना सल्ला देण्यात येत आहे की, डीएपीचा तुटवडा असल्यामुळे पर्यायी खतांचा वापर करावा. पर्यायी खतांमुळे शेतीत पोषण तत्त्वांची योग्य मात्रा राखणे शक्य होते आणि पिकांचे उत्पादन वाढवण्यास मदत होते. त्यामुळे खतांच्या या तुटवड्यामुळे शेतकऱ्यांनी खत वापराच्या बाबतीत अधिक सजग राहणे आवश्यक आहे.

----------

### रात्री तोल जाऊन पडणाऱ्यांना

खात्यात वळवला गेला नाही. कुठल्याही खात्याच्या निधी कमी करण्यात आला नाही. अजितदादा पवार हे उत्तम अर्थमंत्री आणि नियोजन मंत्री म्हणून काम करत आहेत. अशी पावती मुख्यमंत्र्यांनी दिली असेल तर हाके-पडळकर काय बोलतात त्यांना कशाला महत्व द्यायचे, असे ते म्हणाले. ते पुढे म्हणाले, आमच्या प्रवक्त्यांनी त्यांना जी काही नावे, विशेषणे दिली आहे, मला ते शब्द बोलणेही चांगले वाटत नाही. पण त्यांची लायकी काय आहे, ते संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. तोल जाऊन कोण कुठे पडत होते हे सगळ्यांनाच माहिती आहे, त्यामुळे त्यांना फार महत्त्व देऊ नये.

-----------

### डिजिटल अरेस्टच्या नावे शिक्षिकेला

सांगण्यात आले. आम्ही तुम्हाला या प्रकरणातून सोडवू, यासाठी आम्हाला विश्वास नांगरे पाटील यांनी स्पेशल विनंती केल्याचे देखील निवृत्त शिक्षिकेला फोन केलेल्या भामट्यांनी सांगितले. संजय पिसे नावाच्या व्यक्तीने व्हाट्सअप व्हिडिओ कॉल करून आधी या निवृत्त शिक्षिकेला मुंबई पोलिसांचे बनावट ऑफिस, झेंडे, लोगो दाखवून डिजिटल अरेस्ट केली. त्यानंतर भीती दाखवून २१ ते २९ मे या दरम्यान तब्बल ८३ लाख १ हजार ८१६ रुपये उकळले. ३० मे रोजी गुन्हेगारांनी व्हाट्सअप वरून ब्लॉक केल्यानंतर त्यांना त्यांची फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी सायबर पोलीस ठाणे गाठत फिर्याद दिली. त्यानुसार शनिवारी सायबर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सायबर पोलीस करत आहेत.

--------

### देशात कोरोनामुळे

विभागाच्या माहितीनुसार, जानेवारीपासून कोरोनामुळे २८ मृत्यू झाले आहेत. त्यापैकी गेल्या २ दिवसांत २१ जणांचा मृत्यू झाला आहे. शनिवारी बेंगळुरूमध्ये एका ६३ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला. त्याला दोन्ही लसींसह बूस्टर डोस देण्यात आला होता. दिल्लीत एका ६० वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला. महाराष्ट्र आणि केरळमध्ये सर्वाधिक ७ जणांचा मृत्यू झाला आहे. कर्नाटक सरकारने शनिवारी एक सार्वजनिक सल्लागार जारी केला. गर्दीच्या ठिकाणी मास्क घालण्याचे, शारीरिक अंतर राखण्याचे आणि स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहन केले. ताप, खोकला, छातीत दुखणे किंवा श्वास घेण्यास त्रास होत असल्यास त्वरित चाचणी घेण्यास सांगण्यात आले आहे.

---------

### ईशान्य भारताला पावसाचा तडाखा,

अरुणाचल प्रदेशच्या पूर्व कामेंग जिल्ह्यातील बाना-सेप्पा रोडवरील राष्ट्रीय महामार्ग १३ वर भूस्खलनामुळे एक कार खोल खड्ड्यात पडली. या दुर्घटनेत दोन कुटुंबातील ७ जणांचा मृत्यू झाला. दुसऱ्या एका घटनेत २ जणांना आपला जीव गमवावा लागला. मिझोरामच्या सेरछिपमध्ये १३ घरे कोसळली. एका व्यक्तीचा मृत्यू झाला. पुढील काही दिवसांत या परिसरात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. उत्तर सिक्कीममध्ये सुमारे १५०० पर्यटक अडकले आहेत.

------------

### बडतर्फ पोलीस अधिकारी रणजीत

कासले जामीनावर बाहेर आले होते. त्यानंतर त्यांनी पुन्हा त्यांच्या सोशल मीडिया खात्यावरून अनेक गौप्यस्फोट केले. सोशल मीडियावर नेत्यांची ' पोलखोल ' करणं बडतर्फ पोलीस अधिकारी रणजीत कासलेला भोवलं. रणजीत कासलेला मुंबई गुन्हे शाखेने अटक केली. लोकप्रतिनिधींची बदनामी करण तसेच जातींमध्ये द्वेष निर्माण केल्याप्रकरणी रणजीत कासलेला अटक करण्यात आली. रणजीत कासलेला दिल्ली येथे अटक करण्यात आली. त्याला न्यायालयासमोर हजर केले असता दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. सोशल मीडियावर सातत्याने लोकप्रतिनिधी आणि यंत्रणेला लक्ष केल्यामुळे सध्या चर्चेत रणजीत कासले सध्या चर्चेत आला आहे. कासले हा निलंबित आणि बडतर्फ होण्यापूर्वी बीड पोलीस दलाच्या सायबर गुन्हे शाखेत पोलीस उप अधिक्षक होता. वाल्मीक कराड याचा एनकाऊंटर करण्यासाठी आपल्याला प्रस्ताव देण्यात आल्याचा दावा करून त्याने त्यावेळी खळबळ उडवली होती. आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवरून तो सतत काही ना काही खळबजनक दावे करत असल्याने पोलिसांची डोकेदुखी वाढली आहे. नुकताच तो जामिनावर बाहेर आला होता. आता त्याने पुन्हा एकदा बड्या नेत्यांविरोधात दावे केले होते.

----------

### मंत्री संजय राठोड यांनी घेतली

छबुबाई पिराजी राठोड यांना सानुग्रह अनुदानाच्या धनादेशाचे वितरण केले. या प्रसंगी मंत्री राठोड यांनी कुटुंबियांची भावनिक समजूत घातली आणि राज्य सरकार त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे सांगितले. या कुटुंबास सानुग्रह आर्थिक सहाय्य देण्यात आले असून, याशिवाय पुढील मदतीसाठीही शासन स्तरावर पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी सांगितले. यावेळी माजलगावचे तहसीलदार, गट विकास अधिकारी, बंजारा समाजाचे पि.टी.चव्हाण, बाबुराव जाधव, शरद चव्हाण, जीवन राठोड, स्थानिक पदाधिकारी, ग्रामस्थ, प्रशासनातील अधिकारी तसेच मयतांच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. मंत्री राठोड यांच्या या दौऱ्यामुळे पीडित कुटुंबियांना थोडासा दिलासा मिळाला असून, ग्रामस्थांनी त्यांच्या या तत्परतेचे स्वागत केले आहे.

------------

### कृषीमंत्र्यांना घरी बसवून प्रश्न

काय करणार? ढेकळांचे पंचनामे करणार का? असे विधान केले होते. त्यावरून विरोधकांनी त्यांच्यावर चांगलीच टीका केलेली आहे. रविवारी याच पार्श्वभूमीवर प्रसार माध्यमांशी बोलताना कोकाटे यांनी यावर स्पष्टीकरण दिले आहे. कृषीमंत्र्यांना घरी बसवून प्रश्न सुटणार आहेत का? असा सवाल कोकाटे यांनी विरोधकांना विचारला आहे.

cmyk

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. ०२ जून २०२५



## ऊस शेतकऱ्यांना समर्थ सहकारी कारखान्याकडून चुकीची माहिती

**जालना । प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील समर्थ सहकारी साखर कारखाना आणि घनसावंगी तालुक्यातील सागर सहकारी साखर कारखान्याकडून एफआरपी संदर्भात साखर सहसंचालकांना चुकीची माहीती देण्यात आली असून कोणत्याही ऊस उत्पादक शेतकऱ्याने तीन टप्प्यात एफाआरपीची रक्तन द्यावी असा कारखान्यासोबत कोणताही करार केलेला नसतांनाही कारखान्याकडून सरळ-सरळ दिशाभूल करण्यात आल्याचच आरोप अंबड आणि घनसावंगी तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने केला आहे यासंदर्भात ३० मे रोजी कारखान्याचे सभासद यांनी राज्याचे माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे चे कट्टर समर्थक महेंद्र पवार, प्रकाश बोर्डे, अविनाश मांगदरे गोविंद

आर्दड यांनी छत्रपती संभाजीनगर येथील साखर सहसंचालकांची भेट घेऊन त्यांना आम्ही मागील महीन्यात १५ मे रोजी एफआरपी न दिल्याबद्दल कारखान्याविरूध्द कारवाईची मागणी केली होती. त्यासंदर्भात साखर सह संचालकांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी एफआरपीची रक्कम तीन टप्प्यात द्यावी असा कारखान्यासोबत करार केल्याची माहीती दिली. विशेष म्हणजे कोणत्याही ऊस उत्पादक शेतकऱ्याने असा करार केलेला नसून दोन्ही कारखान्यांनी पूर्णपणे खोटी आणि दिशाभूल करणारी माहीती दिली असून या दोन्ही कारखान्याविरोधात कारवाई करावी अशी मागणी संघर्ष समितीच्या शेतकऱ्यांनी केली आहे.

# अहिल्यादेवी होळकर या भारतीय इतिहासातील तेजस्वी, कर्तबगार स्त्री शक्तीचे प्रतिक

## भाजपा प्रवक्ते राम कुलकर्णी यांचे प्रतिपादन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**सनातन धर्म तथा हिंदु संस्कृती टिकवून ठेवताना राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी केलेले कार्यकर्तृत्व अलौकिक असून लोकांच्या मनातील भाव ओळखून राज्यकारभार करताना परमेश्वराला साक्षी ठेवत सामान्य माणसाला न्याय कसा मिळवून द्यायचा ? कृषी धोरण राबविताना तत्कालीन काळात केलेले जलसिंचनाचे प्रयोग, सामाजिक समता धोरण हाती घेताना वाट चुकलेल्यांना ही माफी देवून पुन्हा त्यांना चांगल्या मार्गाला लावण्याचे कसब त्यांच्या नेतृत्वात होते. प्रजाहित दक्ष उद्दिष्ट गाठताना त्यांनी पुण्यकर्माला श्रेष्ठत्व मानलं. देशात बारा हजारांपेक्षा अधिक मंदिरांचा जीर्णोद्धार केला. शुरवीर रागिणी, दुरदृष्टी प्रसंगी एक स्त्री कठोर कशी असते ? हे देखील दाखवून दिलं.**





शुद्ध चारित्र्याचा अलंकार हाच त्यांच्या व्यक्तीमत्वाचा मुख्य पैलू असून त्यांच्याच कार्य कर्तृत्वाचा आदर्श राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस डोळ्यांसमोर ठेवूनच राज्य कारभार करीत असल्याचे प्रतिपादन भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केले. सरकारने चौंडी, पंढरपुर, तुळजापूर तीर्थक्षेत्राच्या जीर्णोद्धारासाठी देवू केलेला विकास निधी त्याचाच एक भाग असल्याचे कुलकर्णी यांनी यांनी सांगितले.

येथील खोलेश्वर महाविद्यालयात स्व.गोपीनाथराव मुंडे सभागृहात अभ्यास मंडळ आयोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या ३०० व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून कुलकर्णी हे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था संचालिका डॉ.कल्पनाताई चौसाळकर या होत्या, तर व्यासपीठावर प्राचार्य डॉ.दिपक फुलारी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी प्रतिमापूजन, मान्यवरांच्या स्वागतानंतर प्रास्ताविकाद्वारे प्राचार्यांनी कार्यक्रमाची रूपरेषा विशद करून पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या कार्याची उपस्थितांना ओळख करून दिली. उपस्थितांसमोर बोलताना कुलकर्णी यांनी १७ वे शतक हे राजमाता अहिल्यादेवी यांच्या कार्यकर्तृत्वाचे होते. भारत भुमीवर सनातन धर्म हिंदू संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी त्यांचे योगदान हे अत्यंत महत्वाचे असून मावळच्या मल्हारराव होळकरांच्या घराण्याची राजगादी त्यांनी २७ वर्षे चालवली. राज्य चालवताना प्रजाचे रक्षण कसे करावे..?, सर्वसामान्य जनतेला न्याय कसा द्यावा..?, शेतकरी, कष्टकरी यांच्या हाताला काम आणि राज्याचे उत्पन्न कसे वाढवावे..? या संदर्भात इतिहासात त्यांनी केलेले विविध कार्य हे नोंद घेण्यासारखे.

१७६१ साली ज्या औरंगजेबाने काशी विश्वनाथ महादेवाचे मंदिर उद्धवस्त केले, त्याच मंदिराचा जीर्णोद्धार याच शुरवीर मातेने केला. आपले आयुष्य ईश्वराला समर्पित करून प्रजाहित जपणारी राजमाता ज्यांच्या नेतृत्वात आपुलकी आणि मायेची सावली होती. डोंगराएवढं दु:ख छातीत दडवून कुशल प्रशासन कसं असतं..? हे दाखविताना प्रसंगी कठोरता ही शत्रुला दाखवलेली आहेच. तत्कालीन काळात शिंदे घराण्याला त्यांनी लिहिलेले पत्र उदाहरण म्हणून सांगता येईल. राजमाता अहिल्यादेवींच्या कारकीर्दीचा इतिहास आपल्या देशात तत्कालीन काळात निर्माण असलेल्या व्यवस्थेने समाजाच्या समोर कधीच मांडला नसल्याची खंत कुलकर्णी यांनी बोलून दाखविली. देशात आणि राज्यात वर्तमान व्यवस्था अहिल्यादेवींचा आदर्श घेवून काम करताना दिसते. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या कार्य कर्तृत्वात देखील अहिल्यादेवींच्याच कार्याची छाया दिसून येते. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना डॉ.कल्पनाताई चौसाळकरांनी अहिल्यादेवींनी केलेले कार्य विविध उदाहरणांसहित पटवून दिले. ईश्वराला समर्पित होवून महिलांच्यासाठी देखील त्यांनी आदर्श प्रस्थापित करताना प्रसंगी कठोर निर्णय घेतले. आत्मनिर्भर त्यापैकीच भाग होता म्हणून माहेश्वरी साडी जगप्रसिद्ध झाल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ.गोपाळ चौसाळकर, प्रा.बिभीषण फड, प्रा.गौतम गायकवाड, आनंद पाठक, डॉ.रविंद्र कुंबेफळकर, डॉ.अजय डुबे, प्रा.जिजाराम कावळे यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी या सर्वांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.जिजाराम कावळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार उपप्राचार्य गौतम गायकवाड यांनी मानले. यावेळी प्रा.शैलेष पुराणिक यांनी कल्याण मंत्राचे सामुदायिक पठण केले.

## छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय पिंपरखेड येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी

वडवणी । प्रतिनिधी



पुण्यश्लोक,, राजमाता ,,धर्म रक्षक ,,अशा विविध नावाने व कार्य आणि परिचित असणाऱ्या,, माता अहिल्याबाई होळकर यांची जयंती मोठ्या उत्साह पूर्ण वातावरणामध्ये,, छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय पिंपरखेड तालुका वडवणी जिल्हा बीड या संस्कार केंद्रामध्ये संपन्न झाली... आपल्या कर्तुत्वाचा ठसा अनेक शूरवीर महिलांनी पूर्वीपासून गाजवलेला आहे. त्यामुळे महिला ही कधीही सक्षम आणि धर्मनिश्चित राहिलेली आपणास दिसून येते ..महिलांनी आपल्या कणखर वाणीने,, कणखर स्वभावाने ,,आणि एकनिष्ठ राहून समाजाला घडवण्याचं व रक्षण करण्याचं काम पूर्वीपासून केलेलं आहे. म्हणून महिला ह्या खऱ्या अर्थाने राजघराण्याचा चांगला वारसा पुढे नेऊ शकतात ..याची असंख्य उदाहरणे इतिहासामध्ये पाहावयास मिळतात.. त्यातच राजमाता अहिल्याबाई होळकर,, यांनी आपल्या कार्याचा ठसा आपल्या कारकीर्दीत फार मोठ्या प्रमाणामध्ये निर्माण केलेला आहे. अशा अहिल्याबाई होळकर, ज्ञानी, कणखर ,आणि स्वाभिमानी होत्या असे ,मत याप्रसंगी छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयाचे सचिव प्रकाश तुळशीराम खळगे सर यांनी व्यक्त केले.. या कार्यक्रमाच्या निमित्ताने ग्रंथपाल..,, सौ शीलाताई सुखदेव उजगरे ,,अंगणवाडी ताई कार्यकर्त्या ,,श्रीमती ,,अग्रि आण्णाभाऊ खळगे, सिस्टर सलोनी खळगे,, अंगणवाडी ताई क्रांती खळगे,, सामाजिक कार्यकर्त्या कोणता बाई जाधव,, मंडाबाई जाधव सत्यभामा आढागळे,, व शालेय विद्यार्थी फार मोठ्या प्रमाणामध्ये उपस्थित होते ..अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याची दखल प्रत्येक समाजातील लोकांनी घेणे गरजेचे आहे ..असे प्रतिपादन याप्रसंगी सचिव खळगे सर यांनी केले ..व आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## सरकारने खरीप २०२५-२६ मध्ये १४ पीकांची भाववाढ ओरडून सांगितली पण खतांचे भाव चोरुन वाढवले

**सारणी । दिनकर जाधव**

केंद्र सरकारने २०२५-२६ खरीप १४ पिकांचे हमीभाव वाढवले आसल्याचे सरकार मोठ्या दिमतीने सांगत असले तरी खतांची केलीली भाववाढीचा सरकार कुठेच उल्लेख करत नाही. त्यामुळे सजग शेतकरी सरकारचा हा ओळखला आसुन हे सरकार शेतकऱ्यांचे नसल्याचे पुन्हा एकदा कृतीतून दिसून येत आहे.



केंद्र सरकारने सोयाबीनच्या हमीभावात प्रतिक्विंटल ४३६ रुपयांची वाढ केली. सोयाबीनचा हमीभाव आता ५ हजार ३२८ रुपये झाला आहे. तर मध्यम आणि लांब धाग्याच्या कापसासाठी प्रतिक्विंटल ५८९ रुपयांची वाढ केली आहे. त्यामुळे खरिप हंगाम २०२५-२६ साठी मध्यम धाग्याच्या कापसासाठी ७ हजार ७१० रुपये हमीभाव असणार आहे. तर लांब धाग्याच्या कापसासाठी ८ हजार ११० रुपये हमीभाव जाहीर करण्यात आला. तुरीच्या हमीभावातही ४५० रुपयांची वाढ करण्यात आली. तुरीचा हमीभाव यंदाच्या खरिपात ८ हजार रुपये असणार आहे. तर मक्याच्या हमीभावातही १७५ रुपयांची वाढ करण्यात आली. मक्याचा हमीभाव आता २४०० रुपये झाला आहे. ज्वारीच्या हमीभावातही ३२८ रुपयांची वाढ करण्यात आली. हायब्रीड ज्वारीला आता ३ हजार ६९९ रुपये हमीभाव असेल. तर मालदांडी ज्वारीला ३ हजार ७४९ रुपये हमीभाव जाहीर करण्यात आला. हमीभाव वाढीविषयी माहिती देताना केंद्रीय माहीती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले.पण याच सरकारने खतांची भाववाढ करत शेतकऱ्यांच्या मानावर सुरी ठेवलेली सरकार सांगत नाही. सुफला खतामध्ये तब्बल ८% पासून २०% पेक्षा जास्त भाव केली, हे मात्र सरकार कुठेही सांगताना दिसत नाही. त्यामुळे गुळाचेषबोट दाखवून शेतकऱ्यांचा खिसा कापण्याचे काम हे सरकार करत आहे.

# स्पर्धेच्या जगात प्रत्येक वेळी स्वत:ला सिद्ध करावे लागेल

## जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी विद्यार्थ्यांना दिला यशाचा कानमंत्र; बीड जिल्हा व्यापारी महासंघाकडून गुणवंतांचा गौरव

बीड । प्रतिनिधी



दहावीचे यश हे जीवनामध्ये अतिशय महत्त्वाचा आहे कारण की या पॉईंटवर आयुष्याला एक महत्त्वाचं वळण लागतं. दहावी, बारावी मध्ये जास्त मार्क्स मिळाले म्हणजे सर्व काही मिळाले असे नाही तर स्पर्धेच्या जगामध्ये आता प्रत्येक क्षणाला स्वतःला सिद्ध करावे लागेल जो विद्यार्थी या सर्व क्षणांना या परीक्षांना तयार राहतो तो आपले ध्येय प्राप्त करतो असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.

बीड जिल्हा व्यापारी महासंघ बीड शहर व तालुकाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी जॉन्सन बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष भास्करराव जाधव, कार्याध्यक्ष अशोक शेटे, शहराध्यक्ष प्रकाश कानगावकर, तालुकाध्यक्ष राजेंद्र बनसोडे, महासचिव तुकाराम साळुंके, सचिव गंगाबिशन करवा, शहरसचिव सुर्यकांत महाजन, तालुका सचिव बाळासाहेब तिवारी व वाय जनार्दन राव यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्याध्यक्ष अशोक शेटे यांनी केले. ते म्हणाले, व्यापार करत असताना ज्या समाजाचे आम्हाला सहकार्य लाभते त्या समाजाला आम्ही काही देणे लागतो या भावनेतून या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. तसेच व्यापारी जसा व्यवसायात मेहनत घेतो, येणार्या अडचणीवर मात करत व्यवसायात यशस्वी होतो तसेच विद्यार्थ्यांनी सुद्धा अभ्यासात मेहनत घेऊन यशस्वी व्हावे असे सांगितले. जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी आपल्या यशाचे रहस्य सांगतांना माझ्यात एक अभ्यासूपणा होता, पण ध्येय निश्चित केल्याशिवाय मी केलेल्या अभ्यासाचा फायदा होणार नाही म्हणून माझ्या आई-वडिलांच्या मार्गदर्शनात मी ध्येय निश्चित केले. जे आज फलश्रूत झाले आहे. आपण कितीही मोठे झालो आणि कुठेही असलो तरी आपण आपल्या मातृभूमीला विसरता कामा नये. कारण ज्या मातीतून आपल्याला आकाशाला गवसणी घालण्याची शक्ती मिळाली त्या मातृभूमीला विसरून चालणार नाही तर त्या मातृभूमीसाठी आपल्याला विकासात्म कर्तव्याची जाणीव असली पाहिजे असेही जॉन्सन यावेळी म्हणाले.

व्यापारी महासंघाचे अध्यक्ष भास्करराव जाधव यांनी महासंघाच्या कामकाजाविषयी माहिती दिली. यावेळी जवाहरलालजी कांकरिया, मदनसेठ दुग्गड, सुशील खटोड, आसारामजी मानधने, मुकेश अग्रवाल, गंगाबिशनजी करवा यांची उपस्थिती होती. आभार प्रदर्शन प्रकाश कानगावकर यांनी केले. यावेळी व्यापारी,पालक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# माजलगावात कर्मयोग करिअर अकॅडमीचा गुणवंत विद्यार्थी सत्कार समारोह

## शौर्य मुगदिया याने ९९ टक्के गुण प्राप्त करून बीड जिल्ह्यात सर्वप्रथम येण्याचा पटकावला मान

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील कर्मयोग करिअर अकॅडमीचा सीबीएसई दहावी परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थांचा सत्कार गुरूवार रोजी संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ, मंगलनाथ बँकेचे कार्यकारी संचालक रवींद्र कानडे पत्रकार पुरुषोत्तम करवा,कार्यकारी संचालक,कर्मयोग करिअर अकॅडमी कैलास काबरा व संचालक,क्लास एज्युकेशनल सर्व्हिसेस शिव प्रसाद कासट या मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.या प्रसंगी प्रास्ताविकात अकॅडमीचे संचालक कैलास काबरा यांनी कर्मयोग अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी दहावी सीबीएसई बोर्ड परीक्षेत १००% निकाल साध्य करून परत एकदा आपला शैक्षणिक गुणवत्तेचा नवीन उच्चांक प्राप्त केला आहे असे सांगितले. या सोबत शौर्य मुगदिया याने ९९ टक्के गुण प्राप्त केले असून बीड जिल्ह्यात सर्वप्रथम येण्याचा मान पटकावला आहे.तसेच अकॅडमीच्या ४३ पैकी ६ विद्यार्थ्यांना ९६ टक्क्याच्या वर गुण असून,१८ विद्यार्थी ९० टक्क्यापेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत.तसेच उर्वरित विद्यार्थ्यांपैकी १३ विद्यार्थी ८० टक्यापेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत असे सांगितले.



या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे राहुल सूर्यतळ यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचे क्षेत्र निवडून त्यामध्ये चांगले करिअर करावे व आपल्या गुरुजनांच्या सतत संपर्कात राहण्याचे आणि आपलं भविष्य विकसित करण्याचे आवाहन करून शिस्त व आत्मविश्वासाशिवाय यश नाही हे स्पष्ट केले. प्रमुख पाहुणे रवी कानडे यांनी विद्यार्थ्यांच्या कठोर मेहनतीला गुरुजनांची साथ असल्यामुळेच कर्मयोग अकॅडमीचे नाव संपूर्ण बीड जिल्ह्यात अग्रस्थानावर निश्चितच येईल असे नमूद केले. विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात येणाऱ्या संघर्षावर कशी मात करावी, सतत कठोर मेहनत आणि आपलं क्षेत्र चांगल्या पद्धतीने कसं निवडावं हेही त्यांनी विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या उदाहरणावरून स्पष्ट केले.गुणवंत विद्यार्थी राजनंदिनी बजाज,समृद्धी कदम व सिद्धी कोठारी यांनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक पटकावला आहे. तसेच अनुश्री मोरे, उत्कर्ष ढाकणे, आयुष वाघमोडे, प्रणव सोळंके, प्रथमेश परदेशी, नैतिक संचेती, श्रीशा गोंडे,रिद्धी कोठारी,प्रज्वल कुलकर्णी,जान्हवी भागवत,अक्षरा भंडारी,वेदिका तौर, ऋषिकेश शेजुळ व साईराज चव्हाण या विद्यार्थांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण घेऊन यश संपादन केले आहे. या प्रसंगी एकूण ३३ विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.या वेळी प्रत्येक गुणवंत विद्यार्थाला ट्रॉफी, पुस्तक,बॅच फोटो फ्रेम व जॅकेट सत्कारस्वरुप देण्यात आले.या घवघवीत निकालासाठी व घेतलेल्या मेहनतीसाठी विद्यार्थी व पालकांनी आपल्या मनोगतात कर्मयोग अकॅडमीचे संस्थापक कैलास काबरा,शिवप्रसाद कासट व शिक्षकांचे अभिनंदन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सौ जयश्री लड्डा यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अकॅडमीच्या सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

पान ६ वरून...

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

अहिल्यादेवी होळकरांच्या तीनशेव्या जयंतीचे आयोजन शहरातील श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुल येथे दि ३० मे रोजी भाजपच्या वतीने करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख म्हणाले अहिल्यादेवींनी देशभरातील विविध मंदिराचे जीर्णोद्धा केले त्या उत्तम राजमाता राज्यकर्त्या,उत्तम प्रशासक,सेविका , दानशूर होत्या आज हा नारी स्त्रीशक्तीचा सन्मान केला व ज्यांना आज आहिल्यारत्न पुरस्कार देऊन त्यांचे कौतुक केले अशा महिलांना जगण्याची उमेद दिली,व हा स्तुत्य उपक्रम राबवला त्याबद्दल शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांचे कौतुक केले. उद्घाटक म्हणून स्नेहल पाठक यांनीही अहिल्यादेवी होळकर यांनी केलेले कार्याबद्दल उजळा देत माहिती सांगितली . याप्रसंगी प्रमुख उपस्थितांमध्ये भाजप संघटन सरचिटणीस देविदास नागरगोजे,भाजप माजी तालुकाध्यक्ष अरुण राऊत,माजी नगराध्यक्ष डॉ. अशोक तिडके, सिद्धेश्वर संकुलाचे पदाधिकारी प्रकाश दुगड,माजलगाव मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी,किट्टी आडगाव मंडळ अध्यक्ष रूपाली कचरे,पात्रुड मंडळ अध्यक्ष डॉ. अभिजीत सोळंके, जन्मोत्सव समिती अध्यक्ष, ज्ञानेश्वर सरवदे,शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, अभय कोकड यांची उपस्थिती होती. याप्रसंगी मतदार संघाचे माजी आमदार आर टी देशमुख यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली तसेच समाजाप्रती व परिवाराप्रती कार्य करणाऱ्या १३ महिलांचा अहिल्या रत्न पुरस्कार देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला, भाजप तर्फे आयोजित निबंधमाला स्पर्धेत यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांनाही पारितोषिक देण्यात आले. जयंती समारोहाची सुरुवात चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन करून करण्यात आली या चित्रपट प्रदर्शनात अहिल्यादेवी होळकरांच्या आयुष्यातील प्रमुख घटनांचा मागवा घेण्यात आला होता. प्रसंगी प्रमुख उपस्थित यांची समायोजित भाषणे झाली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजलगाव भाजपा शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले याप्रसंगी बोलताना मुख्य व्याख्याते प्राध्यापक अशोक बांगर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचा संपूर्ण इतिहास ओघवत्या वाणीत मांडल्याने श्रोते मंत्रमुग्ध झाले त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या आयुष्यातील प्रमुख घटनांचा मागवा घेऊन अहिल्यादेवींचे विचार पुढच्या पिढीपर्यंत जाण्यासाठी भाजपा देशभर साजरा करत असलेल्या या उपक्रमाचे त्यांनी कौतुकही केले. याप्रसंगी रा स्व संघाचे संघाचे तालुका संघचालक जगदीश साखरे, अहिल्यादेवी होळकर जयंती समितीचे प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर, मनोज कोरडे, विशाल देवकते,अविनाश कांडुरे,अँड आरती कांडूरे,संगीता देवकते,ज्ञानेश्वर मेंडके,अभय होके, सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे माजी पदाधिकारी अमरनाथ खुरपे,प्रशांत पाटील,शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह विश्वास जोशी,सुरेंद्र रेदासनी,प्रशांत भानप,ईश्वर खुरपे, शिव शंभू विचार मंचाचे व्याख्याते पवन मोगरेकर,बंडू खांडेकर,दत्ता महाजन,बाळू क्षीरसागर,अनंत जगताप,प्रल्हाद दळवी,हरिभाऊ नवले सिद्धेश्वर राठोड,सुभाष कांबळे,नामदेव मुळे,रमेश शेंडगे यांच्यासह नागरिकांची उपस्थिती होती.

### सार्वजनिक शांततेचा भंग करून

फिर्याद दिल्यावरून पोलीस स्टेशन धारूर येथे आरोपी रमेश वैजनाथ साठे यांच्याविरुद्ध कलम ४५२ ३२३ ५०४ ५०६ ३४ भारतीय दंड संहितेप्रमाणे गुन्हा क्रमांक १६५ ऑब्लिक २०१८ दाखल झालेला होता सदर गुन्ह्यात तपास अधिकारी पोलीस स्टेशन धारूर चव्हाण यांनी तपासांती आरोपी विरुद्ध दोषारोप पत्र दाखल केले होते सन्माननीय प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी साहेब धारूर यांच्या न्यायालयात चारसीट दाखल झाल्यानंतर मग दुनियात आलेल्या साक्ष पुरावा व अँड जे बी बडे यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपी रमेश वैजनाथ साठे यांची निर्दोष मुक्तता करण्यात आलेली आहे आरोपीच्या वतीने अँड जे बी बडे न्यायालय धारूर यांनी युक्तिवाद केला त्यांना अँड एन.बी पांचाळ अँड एम.बी भोसले यांनी सहकार्य केले.

### महाराष्ट्र विकास सेवा

नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. संघटनेच्या राज्य अध्यक्षपदी वासुदेव सोळंके यांची निवड करण्यात आली.

सदरची निवड ही खूप चांगल्या चर्चेने, भविष्याचा सर्वांगीण विचार करून खेळीमेळीच्या वातावरणात एकमताने झालेली आहे.

संघटनेची नूतन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे आहे.

१.अध्यक्ष- वासुदेव सोळंके, २.उपाध्यक्ष- शिवाजी साळुंके, ३.महिला उपाध्यक्ष- रश्मी खांडेकर, ४.सरचिटणीस- तुकाराम भालके, ५.कार्याध्यक्ष :- दादाभाऊ गुंजाळ, ६.कोषाध्यक्ष- रत्नाकर पगार, ७.सल्लागार डॉ सुनील भोकरे ८.प्रवक्ता - शिरीष बनसोडे, ९.महिला प्रतिनिधी:- ज्ञानदा फणसे यावेळी संघटनेचे अध्यक्ष अति मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक सिरसे, कार्यकारिण पदाधिकारी, सदस्य व राज्यातील विविध जिल्ह्यातील अति मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक, उपमुख कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी, सहायक गटविकास अधिकारी, सहायक प्रकल्प अधिकारी उपस्थित होते.

### मुख्याध्यापक संजयराव

सेवागौरव कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य आप्पाराव यादव यांच्या हस्ते विभूते यांचा शाल,पुष्पगुच्छ,भेटवस्तू,आहेर आणि पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. सर्व शिक्षक,कर्मचारी यांनी विभूते यांच्या विषयी आपल्या मनोगतातून हृद्य आठवणींना उजाळा दिला. सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्ती संजयराव विभूते यांनी प्रदीर्घ सेवेतून निवृत्त होताना एकूण ३४ वर्षाच्या कार्यकाळात केलेल्या कामाचा अनुभव सर्वांसमोर मांडत आगामी काळात वेळोवेळी शाळेच्या विविध कामात मदत करण्याचे आश्वासन दिले. अध्यक्षीय समारोपात आप्पाराव यादव म्हणाले की, विभूते सरांनी नेहमीच शाळेच्या आणि विशेषत: विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी अनेक उपक्रम राबवत आपल्या कार्यशैलीतून वेगळा ठसा उमटवत,मनात कोणताही दुराग्रह न बाळगता सत्यत्याने विद्यालयाच्या प्रगतीचा ध्यास घेतला.सर्व शिक्षक आणि कर्मचारी यांना सदैव प्रोत्साहन देत त्यांनी विद्यालयाच्या गुणवत्तावाढीसाठी देखील परीश्रम घेतले असे गौरवोद्गार काढले. सर्वांनी शेवटी विभूते यांना पुढील काळात निरोगी,दीर्घायुष्य लाभावे यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमात सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### पर्यावरणाचे रक्षण व

आणि विविध शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरणाच्या संवर्धनाचा संदेश पोहोचवला जात आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

या उपक्रमा अंतर्गत मंत्री पंकजा मुंडे यांनी सिद्धिविनायक मंदिर परिसरातील स्टॉलधारकांना प्लास्टिक पिशव्यांचा वापर थांबवण्याचे सांगत स्वत: कापडी पिशव्यांचे वाटप करून पर्यावरणपूरक जीवनशैलीकडे वळण्याचे आवाहन केले. तसेच या कार्यक्रमाच्या वेळी प्लास्टिकच्या पर्यायांविषयी माहिती देणारे सूचना फलकांबरोबरच पर्यावरण जनजागृतीच्या घोषवाक्यांनी मंदिर परिसराचे वातावरण दुमदुमून गेले. पर्यावरण रक्षणासाठी शासन, संस्था आणि नागरिकांनी एकत्र येवून काम केल्यास नक्कीच सकारात्मक बदल दिसून येतील असेही मंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी सांगितले. यावेळी सिद्धिविनायक ट्रस्टने सुद्धा प्लास्टिक बंदीसंबंधी जनजागृती कार्यक्रमात सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

cmyk

# नैसर्गिक आपत्ती नुकसानीचा उत्पादन खर्चात समावेश करा - पाशा पटेल

परभणी : हवामान बदलामुळे शेतीपुढील संकटे वाढली आहेत. या स्थितीत कृषी विद्यापीठांना पिकांचा उत्पादन खर्च काढण्याच्या पद्धतीत बदल करावे लागतील. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचा त्यात समावेश करून त्याअनुषंगाने संशोधन करून शिफारस कराव्यात, असे निर्देश राज्य कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी दिले.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठामध्ये राज्यातील चार कृषी विद्यापीठांच्या ५३ व्या संयुक्त कृषी संशोधन विकास समिती बैठक-२०२५ चा (जॉइंट ॲग्रेस्को) समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. यंदाच्या जॉइंट ॲग्रेस्कोमध्ये चार कृषी विद्यापीठांचे २५ वाण, १८ अवजारे, २२५ तंत्रज्ञान शिफारशी प्रसारित करण्यासाठी मंजुरी देण्यात आली. स्वागताध्यक्ष कुलगुरू डॉ. इंद्र मणी अध्यक्षस्थानी होते. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, महाराष्ट्र कृषी परिषदेचे सदस्य विनायक काशिद, जनार्दन कातकडे, डॉ. विठ्ठल शिर्के, संशोधन संचालक डॉ. व्ही. के. खर्चे (अकोला), डॉ. खिजर बेग (परभणी), डॉ. किशोर शिंदे (एमसीएआर), शिक्षण संचालक डॉ.भगवान आसेवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे आदी मंचावर उपस्थित होते. पाशा पटेल म्हणाले, ''हवामान बदलामुळे २०३३ नंतर शेतीपिकाच्या उत्पादनात ४० टक्क्यांपर्यंत घट होण्याची शक्यता आहे. उच्च तापमान तसेच थंडीमुळे शेतीपिकासोबत फळपिकांच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. हवामान बदलांना सामोरे जाताना कृषी शास्त्रज्ञांना नव्याने विचार करावा लागेल. कृषी अर्थशास्त्र विभाग आणि हवामान विभाग यांनी समन्वयातून काम करावे लागेल. तापमान वाढीचे युग संपले असून आता होरपळीचे युग सुरू झाले आहे. कर्ब उत्सर्जन थांबविण्यासाठी पेट्रोल, कोळसा या इंधनांचा वापर बंद करावा लागेल. हरित पट्टे निर्माण करण्यासाठी तत्काळ अंमलबजावणी करावी लागेल. बांबू लागवडीचा प्रचार व प्रसार करावा लागेल. डॉ. गडाख म्हणाले, की कृषी विद्यापीठांना संशोधनासाठी भरीव निधीची गरज आहे.



### २५ वाण, १८ अवजारे, २२५ तंत्रज्ञान शिफारशी प्रसारित :

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे ४ वाण, २ अवजारे, ५३ तंत्रज्ञान शिफारशी, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे ८ वाण, ३ अवजारे, ६१ तंत्रज्ञान शिफारशी, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे ११ वाण, ९ अवजारे, ६१ तंत्रज्ञान शिफारशी, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे २ वाण, ४ अवजारे, ४२ तंत्रज्ञान शिफारशी प्रसारित करण्यात मान्यता देण्यात आली.

आर्थिक स्वायत्ता हवी आहे. त्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करावा, अशी मागणी पाशा पटेल यांच्याकडे केली. डॉ. इंद्र मणी म्हणाले, की रिक्त पदांमुळे संशोधन, शिक्षण, विस्तार कार्यात खीळ बसली आहे. त्यामुळे सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेचा शासनाने पुनर्विचार करावा. शास्त्रज्ञांनी विविध तांत्रिक सत्रातील अहवालाचे सादरीकरण केले. त्यानंतर जॉइंट ॲग्रेस्कोच्या इतिवृत्त पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी पुढील वर्षभरात निवृत्त होणाऱ्या शास्त्रज्ञांचा सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. २०२६ मध्ये ५४ वे जॉइंट ॲग्रेस्को दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठामध्ये आयोजित करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

# आधुनिक पद्धतीने भुईमूग लागवड; एकरी विक्रमी १७ क्विंटल उत्पादन!

**पुणे : शेती करताना शेतकरी प्रामुख्याने अधिक बाजारभाव मिळवून देणारी पिके घेण्याकडे ओढले जात आहे. त्यातच तेलबिया पिकांना पाहिजे तसा भाव मिळत नसल्याने अनेक शेतकरी भुईमूग, सोयाबीन या पिकांपासून दुरावले जात आहे. मात्र, अशातही काही शेतकरी हे तेलबिया पिकांचे भरघोस उत्पादन घेत आहे. आज आपण अशाच एका भुईमूग उत्पादक शेतकऱ्याची यशोगाथा पाहणार आहोत. ज्यांनी भर उन्हाळ्यात भुईमूग पिकाची लागवड करून, त्यातून त्यांनी एकरी विक्रमी १७ क्विंटल भुईमुगाचे उत्पादन घेतले आहे.**

अंकित भोयर असे या शेतकऱ्याचे नाव असून, ते चंद्रपूर राजुरा तालुक्यातील पाचगाव येथील रहिवासी आहे. सध्याच्या घडीला शेतकरी तेलबिया पिकांची प्रामुख्याने पद्धतीने लागवड करतात. मात्र, प्रगतिशील शेतकरी अंकित भोयर यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेती करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी एक एकर शेतात आधुनिक पद्धतीने भुईमूग पिकाची लागवड केली. विशेष म्हणजे त्यांना भर उन्हाळ्यात विक्रमी उत्पादन देखील मिळाले आहे.

**किती मिळाले उत्पादन?**

सामान्यपणे भुईमूग तीन महिन्यांचे उन्हाळी पीक आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापर करून भुईमूग पीक घेतले तर त्याला कमी खर्च येतो. आणि उत्पादनही चांगले होते. असे शेतकरी अंकित भोयर सांगतात. त्यांना यंदा एका एकरात १७ क्विंटल भुईमुगाचे उत्पादन मिळाले आहे. ज्यास सध्या बाजारात सहा हजार रुपये प्रति क्विंटलचा दर मिळाला आहे. ज्यामुळे कमी उत्पन्न मिळणाऱ्या भुईमूग पिकातून त्यांनी नियोजनपूर्वक आर्थिक प्रगती साधली आहे.

**आधुनिक पद्धतीचा अंगीकार :**

''सध्याच्या घडीला शेतकऱ्यांनी कपाशी, सोयाबीन, गहू, हरभरा पिकांसोबत आधुनिक शेती पद्धतीने पीक घेतल्यास उत्पादन वाढले तर नक्कीच फायदा होतो. त्यामुळे सध्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेती करणे गरजेचे झाले आहे. बाजारपेठेत विविध प्रकारच्या जातींचे वाण उपलब्ध आहेत. शेतकऱ्यांनी उत्पादन वाढविण्यासाठी कृषितज्ज्ञांचा सल्ला घेऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला. तर शेतकऱ्यांना त्याचा मोठा फायदा होतो. प्रत्येक शेतकऱ्यांनी आता आधुनिक पद्धतीने शेती केली तर शेतकरी नक्कीच समृद्ध होईल.'' असा सल्ला शेतकरी अंकित भोयर यांनी शेवटी शेतकऱ्यांना दिला आहे.

# सोयाबीनची काढणी, मळणी, साठवण योग्य पद्धतीने करा

सोयाबीन लागवड करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. याबरोबरच देशातील सोयाबीनचे उत्पादनही मागील काही दिवसांत मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे पाहायला मिळाले आहे. असे असले तरी प्रत्यक्षात मात्र सोयाबीनची उत्पादकता कमी झाल्याचे अभ्यासकांचे म्हणणे आहे. म्हणजे पूर्वी एकरी जितका सोयाबीन निघायचा त्याप्रमाणात आता कमी निघत आहे.

सोयाबीनचे अयोग्य नियोजन अन काढणी, मळणी, साठवण तंत्र यातील चुका सोयाबीनची उत्पादकता कमी होण्यास कारणीभूत आहेत. अनेकदा सोयाबीन काढण्यास शेतकऱ्यांना उशीर होतो अन परिणामी त्याचा सोयाबीन उत्पदादानावर परिणाम होऊन उत्पादन घटते.

काढणी :सोयाबीन पीक पेरणीनंतर साधारणतः ९५ ते १०५ दिवसांत काढणीसाठी तयार होते. पीक परिपक्व झाल्यानंतर पिकाची काढणी लवकर करणे फार महत्त्वाचे आहे. योग्य वेळी काढणी न केल्यास शेंगा तडकून उत्पादनात १५ ते २० टक्के घट येते. पीक परिपक्व झाल्यानंतर ८५ ते ९० टक्के पाने देठासहित गळून पडतात. शेंगांचा रंग पिवळा ते काळसर होऊ लागतो. सोयाबीनचे उत्पादन आणि प्रत चांगली राखण्यासाठी पावसाचा अंदाज घेऊन पिकाची काढणी करावी. कारण, बियाणाला पक्वतेनंतर किंचित ओलावा लागला तरी बियाण्याची उगवणक्षमता कमी होते. बियाण्यातील ओलावा १४ ते १५ टक्के असताना कापणीला सुरवात करावी. वेळेवर कापणी केल्यास मळणीमध्ये बियांचे नुकसान होत नाही. पिकाची काढणी धारदार कोयत्याने जमिनीलगत कापून करावी. झाडे उपटून येणार नाहीत याची काळजी घ्यावी. काढणीनंतर सोयाबीनचे एकत्र ढीग किंवा गंजी करून ठेवू नये. यामुळे त्यास बुरशी लागून धान्याची प्रत खालावते. काढणी केलेले पीक उन्हामध्ये चांगले वाळवावे. मळणीसाठी उशीर होणार असेल तरच वाळलेल्या सोयाबीनची गंजी करून ठेवता येईल.




मळणी :मळणी यंत्राने मळणी करताना बियाण्यातील आर्द्रता १४ टक्के पेक्षा कमी नसावी. मळणी यंत्राच्या फेऱ्याची गती प्रति मिनीट ४०० ते ५०० फेरे इतकी ठेवावी. बियाण्यातील आर्द्रतेचे प्रमाण १३ टक्के पर्यंत असेल तर मळणी यंत्राच्या फेऱ्याची गती ३०० ते ४०० फेरे प्रति मिनीट ठेवावी. मळणीवेळी अधूनमधून बियाण्यावर लक्ष ठेवावे. जेणेकरून त्याची डाळ होणार नाही. डाळ होण्याचे प्रमाण जास्त असल्यास वेग कमी करावा.साठवण : मळणीनंतर बियाणांची योग्य ठिकाणी साठवण करणे गरजेचे आहे. योग्य रीतीने साठवण न केल्यास उगवणशक्तीवर विपरीत परिणाम होतो. साठवण करण्यापूर्वी बियाणे २ ते ३ दिवस उन्हामध्ये चांगले वाळवावे. साठवण करतेवेळी बियाण्यामध्ये ओलाव्याचे प्रमाण १० ते १२ टक्के पेक्षा जास्त असू नये. शक्यतो साठवणुकीसाठी पत्र्याच्या कणगीची वापर करावा. पोत्यामध्ये साठवण केल्यास, पोते जमिनीवर सरळ उभे न ठेवता फळीवर ठेवावे. प्रत्येक पोते ८० किलोपर्यंत भरलेले असावे. पोती एकावर एक रचताना ४ पेक्षा पोते एकावर एक ठेवू नयेत.

# वीज पडल्यास जनावरांची अशी घ्या काळजी

सध्या पावसामुळे वातावरण बदल जाणवत आहे. अशा वातावरणात वादळी वाऱ्यामुळे वीज पडण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात आढळत आहेत. वीज पडणे ही एक नैसर्गिक घटना आहे, ज्यामध्ये ढग/वारा हालचाली आणि इतर अशांत वातावरणीय परिस्थितींमुळे निर्माण होणारे विद्युतभार एका प्रवाहकीय मार्गाने जमिनीवर उतरतात, ज्याचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष विनाशकारी परिणाम होतात. याचा थेट परिणाम म्हणजे संरचना, उपकरणे किंवा मानवांमधून जाणारा उच्च प्रवाह (काही हजार किलो अँपिअरच्या श्रेणीत) आणि अप्रत्यक्ष परिणाम म्हणजे उपकरणांच्या व्होल्टेजमध्ये अगदी कमी कालावधीसाठी तात्पुरती वाढ, ज्याला लाट म्हणतात. लोकांवर वीज पडण्याचे परिणाम मोठ्या प्रमाणात नोंदवले गेले आहेत, परंतु आपल्या पशुधनाच्या बाबतीत त्याकडे दुर्लक्ष केले गेले आहे. विजेमुळे प्राण्यांना अपंगत्व येते. ज्या प्राण्यांच्या पुढच्या आणि मागच्या पायांमध्ये बरेच अंतर असते त्यांना विजेच्या दुखापतीचा धोका असतो.

विजेमुळे होणाऱ्या दुखापती : वीज पडणे ही एक तात्काळ, अप्रत्याशित घटना आहे ज्यामध्ये क्षुल्लक ते प्राणघातक अशा असंख्य शारीरिक वैशिष्ट्यांचा समावेश आहे. बळींना सामान्यतः किरकोळ दुखापत, मध्यम दुखापत आणि गंभीर दुखापत आणि किरकोळ दुखापत या तीन गटांपैकी एक मानले जाते. ज्या पीडितांना किरकोळ दुखापत झाली आहे त्यांना प्रभावित अंगात जोरदार मार लागल्याची किंवा आघात झाल्यासारखे वाटते. त्यांना वीज किंवा गडगडाट जाणवला असेल किंवा नसेलही. ते गोंधळ, स्मृतिभ्रंश, तात्पुरते बेशुद्धी, तात्पुरते बहिरेपणा किंवा अंधत्वाची तक्रार देखील करू शकतात. पीडितांना स्नायू दुखणे, गोंधळणे किंवा स्मृतिभ्रंशाची तक्रार असू शकते जी तासनतास ते दिवस टिकते. पीडितांना कानाचा पडदा फुटण्याचा त्रास होऊ शकतो. काही बळींना क्षणिक सौम्य उच्च रक्तदाबाचा अनुभव येतो, जरी महत्त्वाची लक्षणे सामान्यतः स्थिर असतात. कायमस्वरूपी न्यूरोकॉग्निटिव्ह नुकसान होऊ शकते.भाजल्याच्या जखमा : वीज पडताना मोठ्या प्रमाणात ऊर्जा तयार होते. जनावरांमध्ये भाजल्याच्या जखमा दिसून येतात. वीज पडल्यामुळे जखमी झालेल्यांमध्ये कातडीची जळजळ होते आणि मोठ्या प्रमाणात वेदना होतात. विजेच्या झटक्याने बळी पडलेल्यांना विजेच्या स्फोटक शक्तीमुळे, पडून किंवा फेकल्या गेल्यामुळे थेट दुखापत होऊ शकते. कवटी, बरगडी, हातपाय आणि पाठीचा कणा फ्रॅक्चर होऊ शकतो. वीज ही एक अल्पकालीन क्षणिक प्रवाह आहे जी एकाच फ्लॅशमध्ये अनेक वेळा जमिनीवर येऊ शकते. जरी ते जनावर वीज पडण्याच्या जागेच्या अगदी जवळ असले तरी, त्याला प्राणघातक दुखापत होऊ शकते, ज्यामुळे बाधित जनावरांचा मृत्यू होऊ शकतो.



उपचार : विजेमुळे भाजलेल्या जागेवर थंड पाणी टाकावे किंवा कोरफडीचा गर लावावा. बाधित जनावराला त्वरित सुरक्षित जागेवर न्यावे. लवकरात लवकर पशुवैद्यकास बोलवून घ्यावे अथवा नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात बाधित जनावरास नेवून उपचार करून घ्यावे. उपचार झालेल्या जनावरांचे नियमितपणे निरीक्षण करावे. त्यांना आरामदायी वातावरण द्यावे.

सुरक्षेचे उपाय : जनावरांचे गोठे सुरक्षित असणे अत्यावश्यक आहे. अनेकदा गोठ्यांना टिन पत्रे किंवा लोखंडी छत असते, जे विजेच्या धक्क्यांना अधिक संवेदनशील असते. म्हणूनच, अशा गोठ्यांवर वीजरोधक उपकरण (लायटनिंग अरेस्टर) बसवणे गरजेचे आहे. गोठ्याच्या चारही कोपऱ्यांवर वीजचालक नळ्या बसवल्यास विजेचा धक्का थेट जमिनीत उतरतो आणि जनावरांचे रक्षण होते. हे अत्यंत प्रभावी तंत्र आहे. विजांचा कडकडाट ऐकू येताच किंवा पावसाळी वातावरण असेल, तेव्हा कोणतेही जनावर उघड्यावर, विशेषतः झाडाखाली, बांधू नये. झाडांवर वीज पडण्याची शक्यता अधिक असल्यामुळे झाडाखाली असलेल्या जनावरांना धोका होतो. शक्यतो सर्व जनावरे गोठ्यातच ठेवावीत आणि त्यांच्या खुराकाची सोयही त्याठिकाणी करावी. गोठ्याच्या परिसरातील उंच धातूच्या वस्तू किंवा लोखंडी खांब. हे विजेचे आकर्षण बिंदू बनतात, त्यामुळे वीज पडण्याचा धोका अधिक वाढतो. असे खांब, विजेचे टॉवर्स, किंवा इतर उंच धातूच्या वस्तू शक्यतो गोठ्यापासून दूर ठेवाव्यात किंवा त्यावर वीजरोधक उपकरण बसवावे.

# पेरणीसाठी काढलेले शेतकऱ्याचे पैसे बँकेतच झाले चोरी

## ९० हजार रुपये तरुणीने पळवले; कॅमेरॅत घटना कैद

नांदेड : पेरणीसाठी बी-बियाणं आणि खते खरेदी करण्यासाठी बँकेतून काढलेले ९० हजार रुपये एका तरुणीने हातचलाखीनं चोरून नेल्याची घटना तामसा गावातील बँकेत घडली आहे. ही धक्कादायक घटना कॅमेऱ्यात कैद झाली असून, चोरट्या तरुणीचा शोध सध्या पोलिसांकडून घेतला जात आहे. या घटनेनंतर शेतकऱ्याने थेट पोलीस ठाणं गाठत तक्रार केल्यानंतर तरुणीवर तामसा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

हदगाव तालुक्यातील कंजारा गावचे वृद्ध शेतकरी गणपत चव्हाण हे बी-बियाणे खरेदीसाठी तामसा बाजारात आले होते. खरेदीसाठी आवश्यक असलेली ९० हजार रुपयांची रक्कम त्यांनी बँकेतून काढली. बी-बियाणे आणि खताच्या खरेदीसाठी शेतकऱ्याने बँकेतून काढलेले पैसे एका तरुणीने चोरले. चोरीची ही हातचलाखीची घटना बँकेच्या कॅमेरात चित्रित झाली आहे. बँकेच्या गेटमध्येच या तरुणीने त्यांच्या पिशवीमधले पैसे चोरून घेतले.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८०० : कॅनडात जगातील सर्वप्रथम कांजिण्याची लस देण्यात आली.
१८६२ : अलेक्झांडर ग्राहम बेल यांनी टेलीफ़ोनचा शोध लावला.
१८९६ : गुग्लिएल्मो मार्कोनी यांनी 'रेडिओ'चे पेटंट घेतले.
१८९७ : आपल्या मृत्यूचे वृत्त वर्तमानपत्रात वाचून मार्क ट्वेनने न्यूयॉर्क टाईम्सला सांगितले ''माझ्या मृत्यूचे वृत्त ही अतिशयोक्ती आहे''.
१९४६ : राजा उंबेर्तो-२ ला हटवून इटलीने राजेशाही संपवली स्वतःला प्रजासत्ताक घोषित केले.
१९४७ : भारताची फ़ाळणी करण्याची लॉर्ड मांऊटबॅटन यांची घोषणा.
१९४८ : शेतकरी कामगार पक्षाची स्थापना.
१९४९ : दक्षिण अफ्रिकेने गोरे सोडुन इतरांना दुय्यम नागरिक ठरवण्याचा कायदा केला.
१९५३ : इंग्लंडची राणी दुसरी एलिझाबेथ हिचा राज्यारोहण समारंभ झाला. इंग्लंडच्या राष्ट्रप्रमुखाचा राज्यारोहण समारंभ प्रथमच दूरचित्रवाणीद्वारे जगभर पाहिला गेला.
१९६६ : अमेरिकेचे पहिले अंतरीक्ष यान चंद्राच्या पृष्ठभागावर यशस्वीरित्या उतरले.
१९७४ : माली या देशाने आपले संविधान स्वीकारले. (१९७४)
१९७९ : पोप जॉन पॉल (दुसरे) यांनी (आपल्या मायदेशाला) पोलंडला भेट दिली. कम्युनिस्ट राष्ट्राला भेट देणारे ते पहिलेच पोप होत.
१९९९ : भूतानमधे दूरचित्रवाणी प्रसारण सुरू झाले.
२००० : लेखिका व कवयित्री अमृता प्रीतम यांना दिल्ली सरकारचा अकरा लाख रुपयाचा सहस्रकातील कवयित्री हा पुरस्कार जाहीर
२००४ : ऑस्ट्रेलियन मॉडेल्स जेनीफर हॉकिन्स यांनी विश्वसुंदरी चा किताब पटकाविला.
२००६ : अमेरिकेने आंतरराष्ट्रीय गुन्हेगार दाऊद इब्राहिम आणि त्याच्या संपूर्ण संघटनांवर प्रतिबंध लावला.
२०१४ : तेलंगण भारताचे वे२९ राज्य झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७३१ : मार्था वॉशिंग्टन अमेरिकेची पहिली 'फर्स्ट लेडी' (मृत्यू: २२ मे १८०२)
१८४० : थॉमस हार्डी इंग्लिश लेखक आणि कवी (मृत्यू: ११ जानेवारी १९२८)
१९०७ : मराठी नाटककार आणि लेखक विष्णू विनायक बोकील यांचा जन्म.
१९३० : अमेरिकन अंतराळवीर पीट कॉनराड यांचा जन्म.
१९३० : भारतीय जनता पक्षाचे राजकीय नेता व मध्यप्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री बाबूलाल गौर यांचा जन्मदिन.
१९५१ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी व पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या मंत्रिमंडळातील माजी केंद्रीय अवजड उद्योग आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे केंद्रीय कॅबिनेट मंत्री तसचं माजी केंद्रीय ऊर्जा व शिवसेना पक्ष सदस्य अनंत गंगाराम गीते यांचा जन्मदिन.
१९४३ : इलियाराजा गीतकार आणि संगीतकार
१९५५ : नंदन नीलेकणी 'इन्फोसिस'चे सहसंस्थापक
१९५५ : चित्रपट दिग्दर्शक मणिरत्नम यांचा जन्म.
१९५६ : मणीरत्नम चित्रपट दिग्दर्शक
१९६३ : आनंद अभ्यंकर अभिनेते (मृत्यू: २३ डिसेंबर २०१२)
१९६५ : मार्क वॉ ऑस्ट्रेलियन क्रिकेटखेळाडू
१९६५ : स्टीव्ह वॉ ऑस्ट्रेलियन क्रिकेटखेळाडू
१९७४ : गाटा काम्स्की अमेरिकन बुद्धीबळपटू
१९८० : अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय तिरंदाजपटू डोला बॅनर्जी यांचा जन्मदिन.
१९८७ : भारतीय चित्रपट अभिनेत्री व गायिका सोनाक्षी सिन्हा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८२ : जुसेप्पे गॅरीबाल्डी इटालियन सेनापती व राजकीय नेता (जन्म: ४ जुलै १८०७)
१९७५ : देवेन्द्र मोहन बोस वैश्विक किरणांवर मूलभूत संशोधनाची सुरूवात करणारे भारतीय पदार्थवैज्ञानिक (जन्म: २६ नोव्हेंबर १८८५)
१९७८ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय वैज्ञानिक प्राण कृष्ण पारिजा यांचे निधन.
१९८८ : राज कपूर अभिनेता, निर्माता व दिग्दर्शक आणि 'द ग्रेटेस्ट शो मॅन' (जन्म: १४ डिसेंबर १९२४)
१९९० : सर रेक्स हॅरिसन ब्रिटिश आणी अमेरिकन रंगभूमीवरील आणि हॉलिवूड चित्रपटांतील अभिनेते (जन्म: ५ मार्च १९०८)
१९९२ : मराठी संस्कृतीचे जर्मन अभ्यासक डॉ. गुंथर सोन्थायमर यांचे निधन. (जन्म: २१ एप्रिल १९३४)
२०१४ : भारतीय कार्डिनल दुर्यसामी सायमन लौरडुसामी यांचे निधन. (जन्म: ५ फेब्रुवारी १९२४)

# बिंदुसरा धरणाच्या मोठ्या चादरीवर वड –पिंपळाची झाडे

## संभाव्य धोक्याकडे दुर्लक्ष ; नागरीकांना सतर्कतेचे आवाहन करणारे जिल्हा प्रशासन बेफिकीर

बीड। प्रतिनिधीफ

बीड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या महत्वाच्या बिंदुसरा धरणाच्या मुख्य चादरीवर वड,पिंपळ आणि लिंबासारखी झाडे उगवली असुन चादरीच्या बांधकामासाठी धोकादायक ठरणा–या झाडांची छाटणी व काढणी करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे ३ वर्षांपासून करून सुद्धा पाटबंधारे विभाग आणि जिल्हा प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे धरणाच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे . तज्ञांच्या मते झाडांच्या वाढत्या मुळांमुळे पाणी झिरपण्याची प्रक्रिया आधिक सुलभ होते.जी भविष्यात चादरीला तडे जाणे,गळती होणे किंवा पुर्ण रचना कोसळण्यास कारणीभूत ठरू शकते.यामुळे शहराच्या जलस्त्रोतासह हजारो नागरीकांच्या जिवितास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे प्रशासनाने तातडीने चादरीवरील अशी जीर्ण झाडे हटवून भिंतीची डागडुजी करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि रामनाथ खोड यांनी विभागीय आयुक्त,जिल्हाधिकारी बीड,कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग क्रमांक ३ यांना केली आहे.



११ सप्टेंबर २०२२ रोजी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त बीड शहरापासून बिंदुसरा धरणापर्यंत बिंदुसरा नदीच्या काठांवर प्रत्येकी ८ अशा १६ किलोमीटर अंतर लांबीच्या परीसरात मानवी साखळी पद्धतीने बांबुची ५ हजार ९७० रोपट्यांची लागवड करण्यात आली होती.

तेव्हा बिंदुसरा धरणाच्या पायथ्याशी तत्कालीन जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा, पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अजित पवार यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले होते.

तेव्हा त्यांना मुख्य चादरीवरील उगवलेली झाडे दाखविण्यात आली होती तसेच लेखी निवेदनाद्वारे झाडे काढण्याची मागणी केली होती मात्र ३ वर्षे उलटुनही अद्याप चादरीवरील झाडे काढण्यात आली नाहीत. त्यामुळे एकंदरीतच नागरीकांना सतर्कतेचे आवाहन करणारे जिल्हा प्रशासन याबाबतीत बेफिकीर असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे प्रत्येक सिंचन प्रकल्पाची पावसाळा सुरू होण्यापूर्वी आणि पावसाळा संपल्यानंतर तपासणी केली जाते. त्या तपासणीत भिंत, सांडवा आदी बाबी पाहिल्या जातात.

मग असे असताना बिंदुसरा धरणाच्या मान्सुनपुर्व तपासणीत मुख्य चादरीवर उगवलेली झाडे पाटबंधारे विभागाच्या लक्षात कशी आली नाहीत हा खरा प्रश्न आहे अशी बिंदुसरा धरणाच्या मुख्य चादरीवर वड, पिंपळ,लिंबासारखी झाडे उगवल्याचे आम्ही ३ वर्षांपासून निदर्शनास आणुन देऊन प्रशासनाला निवेदन देऊनही प्रशासन दुर्लक्ष करत असुन ही झाडे जशजशी वाढत जातील.तसातसा धरणाच्या रचनेला धोका वाढेल.आज नाही तर ऊद्या त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील.अनेक किल्ले,गड,ईमारती अशा झाडांमुळे ढासळलेली आपण पाहतो.त्यामुळे शासनाने तातडीने दखल घेऊन हि झाडे काढण्यात यावीत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रामनाथ खोड यांनी केली आहे.

## चोरीच्या सात मोटार सायकली पकडल्या

### पाच गुन्हे उघड – स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई



बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यामध्ये मोटरसायकल चोरीचे प्रमाण वाढले असून पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेने एका दुचाकी चोरासह सात मोटरसायकली जप्त केले आहेत.

पोलीस अधीक्षक बीड यांनी बीड जिल्हयामध्ये होणाऱ्या मोटर सायकल चोरीच्या गुन्हयामध्ये वाढ झाल्याने मोटर सायकल चोरीचे गुन्हे जास्तीत जास्त उघडकीस आणण्याचे सुचना स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्याअनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेनेशर्थीचे प्रयत्न सुरु केले होते. दिनांक ३० मे रोजी पोलीस हवालदार भागवत शेलार यांना माहीती मिळाली की , अंबाजोगाई शहरातुन चोरी गेलेल्या गाडया तळेगांव शिवारामध्ये घरामध्ये विक्रीसाठी ठेवल्या असुन त्याची डिल होणार आहे. या बातमीवरुन स्थानिक गुन्हे शाखा बीड येथील पोउनि सिध्देश्वर मुरकुटे व पथकाने तळेगाव येथे छापा मारला असता, आरोपी शेख ईलियास शेख गफार, (वय २५ वर्ष, रा तळेगांव ता.जि बीड) हा चोरीच्या गाडयासह मिळाला. आरोपीकडुन एकुण ०७ मोटार सायकली तपासकामी जप्त केल्या. त्या मोटार सायकली अंबाजोगाई, जालना, छत्रपती संभाजीनगर येथुन चोरल्याचे आरोपीने सांगीतले. आरोपीकडे मिळुन आलेल्या मोटरसायकल मध्ये होडा ड्रिम युगा काळया रंगाची अंबाजोगाई शहर, हिरो स्प्लेंडर प्लस, काळी सिल्वर पट्टा अंबाजोगाई,हिरो सिल्वर रंगाची तालुका जालना, हिरो लाल रंगाची, बेगमपुरा छ.संभाजीनगर, हिरो सिबी शाईन काळी लाल सिल्वर पट्टा बेगमपुरा छ.संभाजीनगर, होंडा सिबी शाईन काळया रंगाची अभिलेख मिळुन आला नाही. होंडा सिबी शाईन काळया रंगाची मिळुन आला नाही. आरोपीकडुन एकुण ०५ चोरीचे गुन्हे उघडकीस आले. असा एकुण ०७ मोटार सायकली किं.अं ६ लाख रुपये मुद्देमाल जप्त केला आहे. वर मिळुन आलेल्या मोटार सायकली मुळ मालकांनी संबधीत पोलीस ठाणेशी संपर्क साधुन घेवुन जाव्यात. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक नवनित काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, अंबाजोगाई अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख, पोलीस उपनिरीक्षक सिध्देश्वर मुरकुटे, पोलीस हवालदार भागवत शेलार, विकास राठोड, दिपक खांडेकर, राहुल शिंदे, नितीन वडमारे, विकी सुरवसे, सुनिल राठोड, मच्छिद्र बीडकर यांनी केलेली आहे.

## केजच्या जेष्ठ नागरिक संघाला अधिकृत मान्यता

### मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला प्रमाणपत्र वितरण सोहळा

केज

केज येथील जेष्ठ नागरिक संघाला नुकतीच 'फेडरेशन ऑफ सिनिअर सिटीजन्स ऑफ महाराष्ट्र' अर्थात 'फेसकॉम्' यांचे अधिकृत नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाले असून याचे रीतसर वितरण शुक्रवारी सायंकाळी केज येथे पार पडलेल्या विशेष कार्यक्रमात करण्यात आले. यावेळी फेसकॉम्? मराठवाडा दक्षिण विभागीय अध्यक्ष डॉ.दामोदर थोरात व विभागीय सचिव जगदीश जाजू यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. केज येथे नुकतेच जेष्ठ नागरिक संघाची स्थापना करण्यात आली आहे.

जेष्ठ नागरिकांच्या बदलत्या आयुष्यात अनेक कौटुंबिक, सामाजिक व प्रशासकीय अडचणी येतात.ज्यांनी आपल्या महत्वाच्या आयुष्यात क्रियाशील राहून कुटुंब,समाज व देशासाठी मोठे कार्य केलेले असते असे



लोकांची वयाची साठी ओलांडल्यानंतर चोहीकडून बेदखल होतात. अशा वेळी संघटनेच्या रूपाने त्यांना एकदुसऱ्याचा आधार बनून अशा अडचणी सोडवता याव्यात व संघटनेच्या रूपाने एकत्र येऊन उर्वरीत आयुष्यात आनंद घेता यावा या उद्देशाने जेष्ठ नागरिक संघ कार्यरत आहे. केज शहरातही रामेश्वर जाजू, राजेसाहेब देशमुख, प्रकाश भन्साळी, जी.बी.गदळे, ॲड.विनयकुमार कुलकर्णी, डी.एस.साखरे,उद्धव तरकसबंद, यांच्यासह इतर जेष्ठ नागरिकांनी या संघाचे फेसकॉम्? अंतर्गत अधिकृत मान्यता प्रमाणपत्र केजच्या संघाला,संघाची केज शाखाध्यक्ष ॲड.राजेसाहेब देशमुख व सचिव जी.बी.गदळे यांच्याकडे फेसकॉम्? मराठवाडा दक्षिण विभागीय अध्यक्ष डॉ.डी. एच.थोरात व सचिव जगदीश जाजू यांच्या वतीने सोपवण्यात आले. डॉ.डी.एच.थोरात यांनी संघाच्या कार्यपद्धतीबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले तर सचिव जगदीश जाजू यांनी संघाच्या तांत्रिक नियम व उपक्रमाबद्दल माहिती दिली. यावेळी आंबेजोगाई येथील जेष्ठ नागरिक संघाचे माजी अध्यक्ष कुंडलिक पवार, विद्यमान अध्यक्ष ॲड.अनंतराव जगतकर, केजचे अध्यक्ष ॲड.राजेसाहेब देशमुख यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व केज संघाचे कोषाध्यक्ष रामेश्वर जाजू यांनीही आपले विचार मांडले. जेष्ठांचे वाढदिवस हे मे–जून मध्ये वाढदिवस असणाऱ्या केज जेष्ठ नागरिक संघाच्या बारा सदस्यांचे वाढदिवस शाल, फेटा व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते साजरे करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघाचे सहसचिव डी.एस.साखरे केले तर सुत्रसंचालन हनुमंत भोसले यांनी केले व आभार माजी प्राचार्य लक्ष्मण जाधव यांनी मानले. कार्यक्रमाला सत्तरहून अधिक जेष्ठ नागरिक उपस्थित होते.



गेवराई – तालुक्यातील सुशी येथे राजमाता राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले यावेळी ग्रामस्थ उपस्थित होते.

## वसंत विद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती

केज । प्रतिनिधी

केज शहरातील वसंत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक तथा प्राचार्य प्रकाश धंडे तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य प्रा.हेमंत देशमुख यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या व उपस्थितांच्या हस्ते राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले.



यावेळी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी मुख्याध्यापक तथा प्राचार्य प्रकाश धंडे, उपप्राचार्य प्रा.हेमंत देशमुख,अनिल कोठावळे, प्रा. सपाटे, प्रा.विठ्ठल समुद्रे, प्रा. अनिल रोडे, गीते सर, सोमवंशी सर यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षण हा उत्तम पर्याय-डॉ.योगेश क्षीरसागर

### बीडमध्ये लोणारी समाजाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



बीड । प्रतिनिधी

लोणारी समाज संख्येने कमी असला, तरी शिक्षणाच्या माध्यमातून आपले अस्तित्व सिद्ध करत आहे. पारंपरिक व्यवसाय जवळपास लोप पावल्याने आता प्रगतीसाठी शिक्षण हा उत्तम पर्याय उरला आहे. समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षणासोबतच नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी समाजातील दोन होतकरू युवकांना संस्थेमध्ये संधी देण्याचा निर्णय घेण्यात येईल, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड मतदारसंघ अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांनी दिली.बीड जिल्हा लोणारी समाज सेवा संघाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन शहरातील लोणारपुरा येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर, राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, पत्रकार ॲड.संदीप बेदरे उपस्थित होते. प्रास्ताविक संघाचे अध्यक्ष अनिल मुळेकर यांनी करताना समाजाच्या कार्याचा व इतिहासाचा परिचय दिला. यावेळी बोलताना कल्याणराव आखाडे यांनी ओबीसी समाजासाठी असलेल्या विविध शासकीय योजना व महामंडळांची माहिती उपस्थितांना दिली. समाज संघटन मजबूत करून, समाज माझा आहे, संघटना आपली आहे ही भावना प्रत्येकाच्या मनात रुजली पाहिजे, असे ते म्हणाले. मार्गदर्शन करताना ॲड. संदीप बेदरे यांनी सांगितले, गुणवंत विद्यार्थी म्हणजेच भाग्यवंत विद्यार्थी. त्यांच्या मेहनतीचं फळ आज समाज त्यांच्या पाठीशी उभा राहून देत आहे. दहावी, बारावीनंतरही उत्तम शिक्षण घेऊन ते उच्च पदांवर पोहोचावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार शैक्षणिक साहित्य, पुष्पगुच्छ, प्रमाणपत्र देऊन करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन गणेश अभिमन्यू मुळेकर यांनी केले. या कार्यक्रमाला माणिक दोडमिसे, नामदेव खांडेकर, नुकुल मुळेकर, किरण निंबाळकर, सुरज दोडमिसे, विनोद मुळेकर, विनोद ढेंबरे, मंगेश ढेंबरे, मनोहर दोडमिसे, संजय उंडे यांच्यासह समाजबांधव आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सेवानिवृत्तीनंतरही सामाजिक संबंध टिकवून ठेवणे गरजेचे – बाबासाहेब उजगरे

### मुख्याध्यापक भागवत घुले यांना सेवापूर्तीनिमित्त निरोप

वडवणी। प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिखलबीड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे ज्येष्ठ मुख्याध्यापक भागवत सखाहरी घुले हे नियत वयोमानानुसार दिनांक ३१ मे २०२५ रोजी आपल्या प्रदिर्घ शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या या सेवापूर्तीनिमित्त त्यांना हृदयपूर्वक निरोप देण्यात आला. यानिमित्त वडवणीच्या गटशिक्षणाधिकारी कार्यालयात या सेवापूर्ती निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी वडवणीचे गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे, चिंचवण केंद्राचे केंद्रप्रमुख सुनिल मुंडे सर, वडवणीचे केंद्रप्रमुख सुरेश करांडे सर, भगवान खाटोकर सर, भैरवनाथ शिंदे सर, सचिन कदम सर, एकनाथ बडे सर, बालाजी कोठूळे सर, नवनाथ गिलबिले सर, दत्तात्रय टिपरे सर, ज्ञानेश्वर वाव्हळ सर, हनूमंत कागणे सर, गणेश बागल सर, भाऊसाहेब राठोड सर, मुंडे सर, संजय नागरगोजे सर, ईश्वर पवार सर, रामेश्वर पाटोळे यांसह इतर सहकारी शिक्षक बांधव, मित्रमंडळी



व इतर मान्यवर उपस्थित होते. भागवत सखाहरी घुले यांची दिनांक २४ नोव्हेंबर १९८८ रोजी वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोन्नाखोटा याठिकाणी त्यांची शिक्षण क्षेत्रात प्रथम नेमणूक झाली होती. त्यांनी एकूण ३७ वर्ष प्रदिर्घ शासकीय सेवा बजावली असून ३७ वर्षांच्या यशस्वी शासकीय कारकीर्दीनंतर ते आज दि.३१ मे २०२५ रोजी नियत वयोमानानूसार जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिखलबीड या ठिकाणाहून पदाचे मुख्याध्यापक या पदावरुन आपल्या सेवेतून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांच्या या सेवापूर्तीनिमित्त वडवणी येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालयात त्यांना सेवापूर्ती निमित्ताने निरोप देण्यात आला. याप्रसंगी अनेक मान्यवरांनी घुले सर यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदान, विद्यार्थ्यांसाठी घेतलेले कष्ट आणि त्यांच्या नेतृत्व गुणांविषयी व एकंदरीत सेवा कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे म्हणाले की, घुले सर यांचा हा सेवानिवृत्ती समारंभ हा एक विशेष प्रसंग आहे, जिथे त्यांना त्यांच्या यशस्वी प्रदिर्घ सेवेसाठी सन्मानित करण्यात येत आहे. घुले सर यांनी शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. त्यांच्या अध्यापन शैलीमुळे अनेक विद्यार्थी घडले आणि त्यांनी आपल्या कार्याने समाजात एक सकारात्मक बदल घडवलेला आहे. त्यांच्या समर्पणामुळे शिक्षक, पालक आणि विद्यार्थी वर्गामध्ये त्यांच्याविषयी आदराची भावना आहे. त्यांचे आजवरचे सेवा कालावधीतील आयुष्य हे अतिशय धकाधकीचे व व्यस्त असे गेलेले आहे. आता सेवानिवृत्तीनंतरचे त्यांचे आयुष्य सुख, समाधान, आनंदी व निरोगी जावे अशा मनोकामना यावेळी त्यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन ज्ञानेश्वर वाव्हळ सर यांनी केले. तर शेवटी सर्व उपस्थितांचे आभार केंद्रप्रमुख सुनिल मुंडे सर यांनी मानले.

## केएसके कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची जैवविविधता वन उद्यानाला भेट



बीड । प्रतिनिधी

केएसके (काकू) कृषी महाविद्यालय, बीड येथील पर्यावरण विज्ञान व आपत्कालीन व्यवस्थापन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी स्व. उत्तमराव पाटील जैवविविधता वनउद्यान, श्री क्षेत्र नारायण गड,बीड येथे वन व वन जैवविविधतेचा अभ्यास करण्यासाठी भेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी वन जैवविविधतेचे महत्त्व समजून घेतले प्लास्टिक मुक्त वन अभियाना अंतर्गत उद्यानातून प्लास्टिक कचरा गोळा करून स्वच्छतेचा संदेश दिला.विद्यार्थ्यांनी जैवविविधता वन उद्यानातील विविध वनस्पती आणि प्राणी प्रजातीचा अभ्यास केला. वनाचे संरक्षण करणे का आवश्यक आहे हे विद्यार्थ्यांनी या अभ्यासातून प्रत्यक्ष अनुभवले सोबतच विद्यार्थ्यांनी वन जैवविविधता मोजमाप पद्धतीचे प्रात्यक्षिक घेतले अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांनी उद्यानाला प्लास्टिक मुक्त करण्याचा अभियानात सक्रिय सहभाग घेतला उद्यानातील प्लास्टिक कचरा गोळा करून त्यांनी पर्यावरणाच्या स्वच्छतेचे महत्व अधोरेखित केले अशा अभियानामुळे प्लास्टिक प्रदूषणावर नियंत्रण मिळवता येते आणि पर्यावरण समतोल राखला जातो हा संदेश त्यांनी दिला. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे सहसचिव डॉ.गोविंद साळुंके, प्राचार्य डॉ.एस.पी.मोरे व पर्यावरण विभागातील डॉ. राऊत सर, सौ.मुटकुळे मॅडम आणि इतर सहकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले या भेटीमुळे विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच मिळाले नाही तर पर्यावरणाच्या संरक्षणाचे महत्त्वही त्यांना प्रत्यक्ष कृतीतून समजले

cmyk

राज्य लोकतंत्र

सोमवार, दि. २ जुन २०२५



# पावसाने उघडीप दिल्याने शेती मशागतीच्या कामांना वेग

## अवकाळी पावसाने खोळंबली होती खरीप हंगामातील मशागतीची कामे, शेतकरी साधणार का पेरणीचा मुहूर्त

ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव

खरीप हंगामावरच शेतकऱ्यांचे अर्थकारण अवलंबून असते. त्यामुळे पावसाने उघडीप दिल्याने खरीपाच्या मशागतीसाठी शेती कामांना वेग आला असुन वेळेत पेरणी करुन अपेक्षित उत्पादन पदरात पाडून घेण्यासाठी पेरणीच्या पूर्वीपासून शेतकरी कामाला लागलेला आहे. उत्पादनवाढीसाठी खरीपपूर्व मशागत ही महत्वाची मानली जाते,त्यात अवकाळी पावसामुळे शेतातील मशागतीचे कामे खोळंबली होती.पण पावसाने उघडीप दिल्याने पुन्हा जोमाने शेतकरी खरीपाच्या मशागतीसाठी लागला आहे. काळाच्या ओघात शेती मशागतीचे कामेही ट्रॅक्टरच्या माध्यमातून आटोपून घेतली जात





होती.अवकाळी पावसामुळे शेतीकडे जाणारे रस्ते चिखलमय झाल्याने व इंधन दरवाढीमुळे सर्वच प्रकारच्या मशागतीसाठी अधिकचे पैसे मोजावे लागत आहेत. त्यामुळे यंदा शेतकऱ्यांनी सर्जा-राजाच्या मदतीनेच ही कामे पूर्ण करण्यात येत आहेत.

हावामान विभागाने मान्सून वेळेपूर्वीच दाखल होणार असल्याचे सांगितल्यानुसार व अवकाळी पावसाने उघडीप दिल्याने शेतकऱ्यांनी शेती मशागतीला सुरवात केली आहे.रब्बी हंगामातील पिकांची काढणी झाली होती मात्र अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांना शेतातील खरीप मशागतीची कामे करता न आल्याने खोळंबली होती.पण दोन दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्या नंतर शेतकऱ्यांनी उत्पादनवाढीसाठी गरजेच्या असलेल्या कामावर लक्ष केंद्रीत केले आहे.

काळाच्या ओघात शेती कामात बदल झाला असून बैलजोडीची जागा आता ट्रक्टर आणि इतर यंत्रांनी घेतली आहे.मात्र अवकाळी पावसाने रस्ते चिखलमय झाल्याने व वाढत्या इंधन दरामुळे यंत्राच्या सहाय्याने शेती मशागत करणे शक्य नाही. त्यामुळे जुनं तेच सोनं म्हणत शेतकऱ्यांनी खरीप हंगामात बैलजोडीच्या माध्यमातून शेती मशागतीच्या कामांना प्राधान्य दिले आहे.नांगरण, मोगडण आणि आता पाळी पूर्ण झाल्यानंतर शेतकरी हे चाढ्यावर मूठ ठेवत असतात. मात्र, गेल्या काही दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील शेती मशागतीच्या कामांना वेग आला असून शेतकरी यंदा मृगाचे मुहूर्त साधणार की नाही अशी शंका आहे.

### मृगा नक्षत्रात चाढ्यावर मूठ

खरीप हंगामातील पिकांची वाढ आणि अपेक्षित उत्पादनासाठी वेळेत पेरण्या होणे महत्वाचे मानले जाते. खरिपाची पेरणी हा धावून करावी असे म्हणतात.म्हणजेच अपेक्षित पाऊस झाला की शेतकऱ्यांची मूठ ही चाढ्यावर असणे गरजेचे आहे. त्यामुळे पाऊस पडल्यानंतर दिरंगाई होऊ नये म्हणून शेतकरी हंगामाच्या पूर्वीपासूनच कामाला लागत असतो पण यंदा अवकाळी पावसामुळे खरीप हंगामातील कामे शेतकऱ्यांना करता आलेले नाहीत पण सध्या अवकाळी पावसाने उघडीप दिल्याने खरीपपूर्व मशागतीची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत.




**माजलगाव:- येथे शिवसेनेचे मृद व जलसंधारण मंत्री ना.संजय राठोड माजलगाव येथे आले असता त्यांचा सत्कार करताना शिवसेना तालुका प्रमुख तुकाराम येवले,शिवसेना शहरप्रमुख धनंजय पापा सोळंके,युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे**

# पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करणे ही आपली सर्वांची जबाबदारी- पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे

मुंबई । प्रतिनिधी

देशाचे जबाबदार नागरिक म्हणून पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करणे, नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करून प्रदूषण कमी करणे, तसेच वन्यजीव आणि वनस्पतींचे संरक्षण ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. हा कार्यक्रम धार्मिक स्थळाच्या परिसरात पर्यावरणपूरक सवयी रुजविण्याबरोबरच पुढच्या पिढ्यांसाठी स्वच्छ आणि हरित भविष्य घडवण्याच्या दृष्टिकोनातून महत्वाचे पाऊल ठरणार असल्याचा विश्वास पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी व्यक्त केला.

आज मुंबईतील सिद्धिविनायक मंदिर परिसरात नागरिकांमध्ये सिंगल युज प्लास्टिक



टाळण्याचे आवाहन तसेच सिंगल यूज प्लास्टिक बंदीबाबत जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मंत्री श्रीमती. मुंडे बोलत होत्या. या कार्यक्रमास सिद्धिविनायक मंदिर समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, सिंगल युज प्लास्टिकचा भस्मासुर रोखायलाच हवा, सिंगल युज प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे याकरिता सिंगल युज प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळण्यासाठी संकल्प, संयम आणि प्रत्यक्ष कृती याची नितांत गरज आहे. शासन स्तरावर सिंगल यूज प्लास्टिकच्या वापरामुळे होणाऱ्या पर्यावरणीय समस्यांना आळा घालण्यासाठी वेळोवेळी महत्त्वपूर्ण पावले उचलली जात आहेत. यासाठी विभागामार्फत प्लास्टिक कचरा व्यवस्थापनासाठी प्रभावी धोरणे आणि नियम ही लागू करण्यात आले आहेत. सिंगल यूज प्लास्टिकवर निर्बंध घालण्याबरोबरच, जनतेमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी शाळा, कॉलेज, आणि सार्वजनिक ठिकाणी जागरूकता मोहिम देखील राबवल्या जात आहेत. कार्यशाळा, चर्चासत्रे, ◀◀ पान ३ वर

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार पुढे नेला-प्रा.बांगर

## माजलगावात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या हिंदू धर्म जिर्णोद्धारक होत्या त्यांनी आयुष्यभर छत्रपती शिवाजी महाराजांचेच विचार पुढे नेण्याचे कार्य केले आहे भारतात काश्मीर ते कन्याकुमारी शेकडो मंदिरांचा जीर्णोद्धार त्यांनी केला असून त्यांच्या मंदिर निर्माणच्या कार्यामुळेच आज आपण आपल्या आराध्यांचं दर्शन घेऊ शकतो पुढील पिढीपर्यंत त्यांचा इतिहास गेला पाहिजे असे मत प्राध्यापक अशोक बांगर यांनी माजलगाव येथे आयोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या जयंती



प्रसंगी केले.

पुण्यश्लोक ◀◀ पान ३ वर

# पुण्यश्लोक राजमाता अहिल्या देवी होळकर यांच्या जयंती निमित्त रक्तदान शिबिर संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

**पुण्यश्लोक राजमाता अहिल्या देवी होळकर यांच्या जयंती* निमित्त सेवा भारती देवगिरी,जिल्हा बीड व लोकसेवा मंडळ ट्रस्ट संचलित रुग्णमित्र,बीड* यांच्या संयुक्त विद्यमाने माता रमाई नगर येथील सेवा भारती,बीड संचालित माता रमाई ओपीडी येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.**

या रक्तदान शिबिरात



एकूण ४१ जणांनीरक्तदानकेले.


या कार्यक्रमाला सेवा भारती देवगिरी प्रांत सह सचिव डॉ सुभाष जोशी,बीड जिल्हा अध्यक्ष डॉ विनोद ओस्तवाल,जिल्हा सचिव महेश कुलकर्णी, कोशाध्यक्ष सुनील खजिनदार , डॉ पुरुषोत्तम कुलकर्णी ,डॉ विवेक पालवणकर ,गोपाळ नाईक हे उपस्थित होते.

हे शिबीर यशस्वी करण्यासाठी पूर्णवेळ रुग्णमित्र नारायण पवार, तसेच सेवा भारतीचे रवींद्र फड,शंतनू घाडगे,विजय कोठुळे,यशवंत देशमुख,कुलदीप साखरे,अशोक घोडके,अश्विन ताकतोडे,,मुकुंद कुलकर्णी,प्रशांत घुगरे,बंकट वैष्णव आणि जिल्हा रुग्णालय रक्तपेढी कर्मचारी वर्ग बीड यांनी सहकार्य केले.

# भरधाव ट्रकने दुचाकीस्वारास चिरडले दुचाकीस्वराचा जागीच मुत्यू

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव कडुन तेलगावकडे जाणाऱ्या भरधाव ट्रकने तेलगावकडून माजलगावकडे येणाऱ्या दुचाकीस्वारास समोरासमोर जोराची धडक देऊन झालेल्या गंभीर अपघातात दुचाकीस्वार चिरडल्याची दुर्दैवी घटना दि ०१ जुन रविवार रोजी दुपारी २:३० वाजण्याच्या सुमारास माजलगाव -तेलगाव रोडवरील टालेवाडी फाट्यावर घडली आहे.या अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मुत्यृ झाला आहे.




या अपघाता संदर्भात मिळालेली माहिती अशी की, महारुद्र भीमराव लोंढे (रा.खालापुरी (बीड) असे मयत व्यक्तीचे नाव असून,तो तेलगावहून माजलगावकडे दुचाकीवरुन जात असताना हा अपघात घडला आहे. माजलगावहून तेलगावकडे जाणारा ट्रक (एम एच ४४.७३७१) आणि दुचाकी क्रं.एम.एच.२३,७४२ या दुचाकीची समोरासमोर धडक होऊन झालेल्या गंभीर अपघातात दुचाकीस्वार महारुद्र लोंढे याचा जागीत मुत्यृ झाल्याची दुर्दैवी घटना दि ०१ जुन रविवार रोजी दुपारी २:३० वाजण्याच्या सुमारास माजलगाव -तेलगाव रोडवरील टालेवाडी फाट्यावर घडली आहे.पालखी महामार्गावरील रस्त्याच्या मधोमध पडलेल्या भेगा या अपघातास कारणीभूत असल्याचे बोलले जात आहे.

# अखेर श्री सावित्री कंपनीकडून शेतकऱ्यांची अडचण दूर

## गुत्तेदाराकडून सौर पॅनला चुकीचे कनेक्शन, शेतकरी आणि कंपनीला झाला होता नाहक त्रास

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**अंबाजोगाई तालुक्यातील अकरा शेतकऱ्यांना श्री सावित्री कंपनीकडून तीन एचपी चे सौर कृषी पंप वाटप करण्यात आले होते. गुत्तेदाराने हे पंप बसवताना सौर पॅनल मधील कनेक्शन योग्य न दिल्यामुळे शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागला होता. श्री सावित्री कंपनीकडून शेतकऱ्यांना पंप आणि कंट्रोलर चालू अवस्थेतले वाटप करण्यात आले होते. मात्र कंपनीने नेमलेले गुत्तेदाराकडून सौर पॅनल ला योग्य कनेक्शन न दिल्यामुळे शेतकरी आणि कंपनीला नाहक त्रास सहन करावा लागला होता. रोटोमॅग कंपनीच्या सर्विस सेंटर विभागाचे टेकनिशन टिम**



**येऊन शेतकऱ्यांची अडचण दूर केली. गुत्तेदाराच्या चुकीमुळे काही शेतकऱ्यांचे नुकसान देखील झाले आहे.**

अंबाजोगाई तालुक्यात शेतकऱ्यांनी सौर कृषी पंपासाठी श्री सावित्री कंपनीची निवड केली होती. शेतकऱ्यांना श्री सावित्री कंपनीकडून पंप आणि सौर पॅनल कंट्रोलरचे वाटप देखील करण्यात आले. गुत्तेदाराने पंप बसवून शेतकऱ्यांना पंप सुरू न करून देता पळ काढला होता. गुत्तेदाराने पंप सुरू न करून दिल्यामुळे शेतकऱ्यांनी महावितरण कंपनीकडे तक्रार केली होती. सौर पॅनल ला योग्य कनेक्शन न दिल्यामुळे शेतकऱ्यासह सावित्री कंपनीला शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले. श्री सावित्री कंपनी आणि रोटोमॅग टेक्निकल विभागाने अकरा शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन सौर पंप सुरू करून दिले. शेतकऱ्यांमध्ये असलेले नाराजी श्री सावित्री कंपनीकडून दूर करण्यात आली. श्री सावित्री कंपनीने पंप सुरू करून दिल्यामुळे शेतकऱ्या मध्ये आनंदाचे वातावरण आहे.

**आमचा पंप आणि सौर पॅनल सहा मे रोजी शेतात श्री सावित्री कंपनीच्या गुत्तेदराने बसून दिला होता. त्या गुत्तेदाराला पंप सुरू न करता आल्यामुळे आम्हाला त्रास सहन करावा लागला. कंपनीने दिलेले पंप आणि कंट्रोलर चांगले होते. गुत्तेगाराच्या चुकीमुळे आम्हाला त्रास सहन करावा लागला. कंपनीच्या टेक्निशन टीमने येऊन आमचा पंप सुरू करून दिला.**

**दिलीप वाघमारे शेतकरी सोमनाथ बोरगाव ता. अंबाजोगाई**

# महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेच्या राज्य अध्यक्षपदी वासुदेव सोळंके यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर येथे आब्दीमंडी दौलताबाद येथील हॉटेल फोर्ट व्हिव रिसॉर्ट येथे झालेल्या राज्यस्तरीय अधिवेशनामध्ये महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेचे मावळते राज्यअध्यक्ष सुरेश बेदमुथा ,अपर आयुक्त, छत्रपती संभाजी नगर यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने निरोप देण्यात आला. यावेळी संघटनेच्या ◀◀ पान ३ वर





# मुख्याध्यापक संजयराव विभूते शासकीय नियमानुसार सेवानिवृत्त

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था,अंबाजोगाई संचालित पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयाचे मुख्याध्यापक संजयराव विभूते हे दि.३१ मे २०२५ शनिवार रोजी आपल्या ३४ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून शासकीय नियमानुसार सेवानिवृत्त होत आहेत.

त्यानिमित्ताने विद्यालयात विभूते यांचा ◀◀ पान ३ वर

# सार्वजनिक शांततेचा भंग करून हाणमार केल्याचे आरोपातून पोलीस कॉन्स्टेबल रमेश चाटे यांची निर्दोष मुक्तता

किल्ले धारूर । प्रतिनिधी

फिर्यादीने दिनांक १२ जुलै २०१८ रोजी दिवसभर त्यांच्या म्हशी शेत नावे तळ्याचे शेतामध्ये चारून संध्याकाळी सहा वाजता त्याच्या गोठ्यामध्ये म्हशी बांधल्या व जेवण करण्यासाठी घरी गावाकडे केकान वाडी येथे गेले त्यानंतर ते जेवण करून म्हशीचे कोट्यामध्ये झोपण्यासाठी संध्याकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास शेतात गेले व कोट्यामध्ये झोपले असताना संध्याकाळी दिनांक १३ जुलै २०१८ रोजी अंदाजे साडेबारा वाजण्याच्या सुमारास कुत्रे भुंकण्याचा आवाज आल्याने ते जागे



झाले त्यावेळी त्यांचे खोट्यासमोर दगडाचा भडीमार केल्याने दगडाचा आवाज आला ताबडतोब आरोपी रमेश वैजनाथ चाटे राहणार केकान वाडी व इतर तीन लोकांनी त्यांच्या म्हशीच्या पोटामध्ये अनधिकृत प्रवेश करून जुन्या भांडणाचे कुरापत काढून मोठमोठ्याने फिर्यादीला शिवीगाळ करून लाथा बुक्क्याने मारहाण केली व तुला आम्ही जिवंत मारल्याशिवाय सोडणार नाहीत असे म्हणाल्याने फिर्यादी मोठ्याने ओरडला असता गावातील त्याचा चुलत भाऊ ओरडण्याचा आवाज ऐकून आला व त्यावेळी आरोपी पळून गेल्याची ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# आठवड्यातील एक दिवस जनतेसाठी निश्चित करा': लोणावळ्यातील आढावा बैठकीत आमदार सुनील शेळके यांची अधिकाऱ्यांना सूचना

**लोणावळा । प्रतिनिधी**

शहरातील विविध विकास प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करत आमदार सुनील शेळके यांनी लोणावळा नगर परिषदेत आढावा बैठक घेतली. सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य आणि सुरक्षाविषयक गरजांशी संबंधित असलेल्या प्रकल्पांची गती वाढवून नागरिकांना अधिक सक्षम व दर्जेदार सुविधा मिळाव्यात, हा दौऱ्यामागचा उद्देश असल्याचे आमदार शेळके यांनी स्पष्ट केले.



विकासकामांची पाहणी आटोपल्यानंतर नगरपरिषद कार्यालयात सर्व संबंधित अधिकारी, अभियंते आणि प्रशासकीय प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली. यावेळी प्रत्येक प्रकल्पावरील कामाची सद्यस्थिती, येणाऱ्या अडचणी, निधीची स्थिती आणि पूर्णत्वासाठी लागणारा कालावधी याबाबत चर्चा करण्यात आली.

शहरातील उपजिल्हा रुग्णालयाचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे, लोणावळा शहर व ग्रामीण पोलीस स्टेशनच्या इमारती देखील ८० टक्के काम पूर्ण झाले, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक सुशोभीकरण आणि भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा सुशोभीकरण ही कामे ७० टक्के पूर्ण झाली आहेत, उर्वरित कामांना गती देण्यासाठी वाढीव निधी देण्याचे आश्वासन आमदारांनी दिले.

लोणावळा शहरातील नागरिकांचा जिव्हाळ्याचा विषय असलेला नांगरगाव-भांगरवाडी या उड्डाणपुलाच्या कामाला गती देण्यात आली असून जिल्हाधिकारी स्वतः या कामाची पाहणी करण्यासाठी व शहरातील इतर विकास कामांचा आढावा घेण्यासाठी ५ जुलै रोजी लोणावळा शहरामध्ये येणार असल्याची माहिती आमदार शेळके यांनी बैठकीत दिली.

या विकास कामांची केली पाहणी ग्रामीण पोलीस स्टेशन तुंगार्ली, पांगळोली शासकीय इमारत, खंडाळा गावातील शाळेची जागा, लोणावळा शहर पोलीस स्टेशनची नवीन इमारत, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, कन्याशाळा भांगरवाडी, उपजिल्हा रुग्णालय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक

नागरिकांच्या तक्रारी अन् आमदारांची सूचना आढावा बैठकीदरम्यान नागरिकांनी, नगरपरिषदेमध्ये वारंवार चकरा मारून देखील समस्या सुटत नसल्याची तक्रार केली. तसेच मुख्याधिकारी नागरिकांना भेटत नाही, नागरिकांशी योग्य प्रकारे संवाद साधत नाही, अशाही तक्रारी समोर आल्या. त्यावर, लोणावळा मुख्याधिकारी यांनी नागरिकांना वेळ देण्यासाठी आठवड्यातील एक दिवस निश्चित करावा. त्या दिवशी कार्यालयामध्ये उपस्थित राहून नागरिकांचे प्रश्न सोडवावेत, त्यांच्या समस्या ऐकून घ्याव्यात, अशी सूचना आमदार सुनील शेळके यांनी मुख्याधिकारी तथा प्रशासक अशोक साबळे यांना केली.

# बावडा- गणेशवाडीची ग्रामसभा गोंधळामुळे गुंडळली

**इंदापूरत । प्रतिनिधी**

बावडा (ता. इंदापूर) येथील गणेशवाडी येथे ग्रामसभा जलजीवन मिशनअंतर्गत झालेल्या दर्जाहीन कामाची जिल्हाधिकाऱ्यांमार्फत चौकशी व्हावी, अशी मागणी आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या स्मारकाच्या जागेच्या वादावरून गोंधळ झाल्याने पदाधिकाऱ्यांनी पाय काढल्याने इतर विषयांवर चर्चा न होताच एक तासाच्या गोंधळानंतर गुंडाळण्यात आली. सुरुवातीस शासनाच्या वैयक्तिक व सार्वजनिक लाभाच्या योजनेच्या सर्व लाभार्थ्यांना शिफारस देण्याचा ठराव ग्रामसभेत ग्रामस्थांनी एकमताने मंजूर केला.

बावडा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या गणेशवाडी (प्रभाग एक) येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त ग्रामसभेचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी सरपंच पल्लवी गिरमे होत्या. यावेळी महादेव घाडगे, संतोष सुर्यवंशी, विठ्ठल घोगरे, दीपक घोगरे, राजेंद्र व्होनमाने, सुधाकर कांबळे, तानाजी गायकवाड, नामदेव घोगरे, तुकाराम घोगरे, किरण खंडागळे, मुनीर अत्तार, अश्वजित कांबळे, विशाल कांबळे, धनाजी शेंडगे, गणेश घोगरे, सागर खंडागळे, अश्विनी साठे, अविनाश खंडागळे, महावीर साठे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

ग्रामसभेच्या ठरावाचे वाचन ग्रामपंचायत अधिकारी अंबिका पावसे यांनी केले. ज्या लाभार्थ्यांना कृषी, रोहयो, समाजकल्याण, ग्रामविकास, महसूल विभागाच्या योजनांचा लाभ घ्यायचा आहे, त्यासाठी महा ई सेवा केंद्रावरून ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करावा लागेल. त्यासाठी ग्रामसभेचा ठराव सर्वांना देण्याचा ठराव मंजूर केला. तर रमाई आवास योजना, अहिल्याबाई होळकर आवास योजना, दिव्यांग आवास योजना, यशवंत घरकुल अशा विविध योजनांची माहिती देण्यात आली. तसेच सभेत आलेल्या काही अर्जाचे वाचन केले. त्यामध्ये संतोष खंडागळे यांनी गणेशवाडी येथील जलजीवन योजनेचे काम दर्जाहीन झाले असून, त्याची सखोल चौकशी होऊन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी अर्जाद्वारे जिल्हाधिकारी व ग्रामसभेला केली. ग्रामसभेने सदर अर्ज जिल्हाधिकाऱ्यांकडे पुढील कारवाईकरिता पाठवण्याचा ठराव मंजूर केला.

सभेच्या अजेंड्यावरील बाकी काही विषय शिल्लक असताना गणेशवाडी येथील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या स्मारकासाठी दिलेल्या जागेसंदर्भातील विषयावर चर्चा सुरू होताच प्रचंड वादावादी झाली. त्यातून मार्ग काढण्यासाठी अनेकांनी प्रयत्न करूनही त्यास यश आले नाही. याविषयावर वादावादी वाढतच चालल्याने सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, सदस्यांनी सभेतून काढता पाय घेतला. सभेतील अनेक विषय व अर्जाचे वाचन शिल्लक ठेवून ग्रामसभा गुंडाळण्यात आली.

# औंध आयटीआयमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**औंध । प्रतिनिधी**

दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर एखादा अभ्यासक्रम पूर्ण करून लगेचच नोकरी मिळेल, किंवा एखादा व्यवसाय सुरू करता येईल, अशा तयारीने अनेक विद्यार्थी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत (आयटीआय) प्रवेश घेऊ इच्छितात. परंतु, आपल्या आवडीनुसार किंवा एखाद्या विषयाचे कौशल्य आत्मसात करण्याच्या हेतूने नेमका कोणता आयटीआय अभ्यासक्रम निवडायचा, हे जाणून घेण्यासाठी विद्यार्थी-पालक आयटीआयमध्ये समूपदेशनासाठी येत आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत अशाच पद्धतीने दररोज अनेक पालक विद्यार्थ्यांसह निःशुल्क मार्गदर्शनासाठी येत आहेत. अनेक पालक अभ्यासक्रमांची माहिती घेण्यासाठी येत असून त्यांना ऑनलाइन अर्ज भरणे, प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे याविषयीचे मार्गदर्शन आयटीआयमध्ये केले जात आहे. विद्यार्थ्यांचा कल पाहता त्याला योग्य असा अभ्यासक्रम निवडण्यासह शिक्षणानंतर रोजगाराच्या संधी याबाबत सांगितले जात आहे. एवढेच नव्हे, तर विद्यार्थी-पालकांसाठी 'प्रयोगशाळा भेट' आयोजन करून त्यांना प्रत्यक्ष आयटीआयमध्ये प्रात्यक्षिकांवर आधारित कसे शिकविले जाते, याची माहिती दिली जात आहे.

# बाबा आढाव यांचे संपूर्ण आयुष्य समाजासाठीच, शरद पवार यांच्याकडून कौतूक

**पुणे । प्रतिनिधी**

जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि कष्टकरी चळवळीचे आधारस्तंभ बाबा आढावा यांचा ९५ वा वाढदिवस रविवारी साजरा करण्यात आला. पुण्यातील मार्केट यार्डमधील हमाल पंचायतीच्या कार्यालयात शरद पवार यांच्या उपस्थितीत बाबा आढाव यांचा वाढदिवस साजरा झाला. बाबा आढाव यांनी संपूर्ण आयुष्यभर कष्टकऱ्यांची सेवा केली. त्यांचा १०० वा वाढदिवस पण आपण मोठ्या उत्साहात साजरा करू, या शब्दांत अनोख्या शुभेच्छा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी दिल्या.




बाबा आढाव यांचा गौरव करताना शरद पवार म्हणाले, ९५ वा वाढदिवस साजरा करण्याचे भाग्य काही लोकांनाच मिळते. मोजक्या लोकांच्या जीवनात हा क्षण येतो. बाबा आढाव यांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य कष्टकऱ्यांच्या सेवेसाठी वेचले. या वयात बाबा आढाव सक्रियपणे काम करत आहेत. आजही ते विधायक कामे करत आहेत. अन्याय अत्याचार विरोधात लढत आहेत. सामान्य माणसांचे ओझे हलके करण्याचे काम करत आहेत. आपण सर्वांसाठी ते मोठा आदर्श आहे. बाबा आढाव यांच्या कार्यकर्तुत्वाचे कौतूक करत शरद पवार म्हणाले, कष्टकऱ्यांच्या जीवनात स्थिरता कशी येईल, त्याचा सातत्याने विचार करत बाबा काम करत राहिले. संपूर्ण आयुष्य कष्टकऱ्यांसाठी काम करत त्यांच्या जीवनात परिवर्तन आणण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यांनी नेहमी सामान्य माणसांचे हितच पाहिले आहे. कष्टकरी, कामगार यांच्यासाठी ते काम करत राहिले आहेत. उपेक्षित समाजातील लोकांना संघर्ष करण्याची वेळ येऊ नये, यासाठी ते काम करत आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासात बाबांनी मोठे कार्य केले. आम्ही लोकांनी त्यांचे मार्गदर्शन वेळोवेळी घेतले आहे.

बाबा आढाव यांनी त्यांचे आयुष्य समाजासाठी दिले आहे. त्यांना वाढदिवसाच्या निमित्ताने सदिच्छा देतो. तसेच लवकरच त्यांचा शंभरावा वाढदिवस आपण साजरा करु, असे शरद पवार यांनी म्हटले. १९५३ सालापासून बाबा आढाव यांनी सामाजिक चळवळीत भाग घेतला. या काळात त्यांनी हमाल पंचायत, रिक्षा पंचायत, मोलकरीण पंचायत, पथारी व्यावसायिक पंचायत, कागद-काच- पत्रा कष्टकरी पंचायत, बांधकाम कामगार पंचायत, टेम्पो पंचायतीच्या माध्यमातून कष्टकऱ्यांसाठी काम केले.

# राष्ट्रवादी काँग्रेसकडून पुणे शहराचे अध्यक्ष व कार्याध्यक्ष जाहीर; 'या' नेत्यांना दिली संधी

**पुणे । प्रतिनिधी**

स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेसने आपल्या पक्षात काही बदल केले आहेत. पुणे शहराचे पूर्व पुणे व पश्चिम पुणे असे दोन भाग करून प्रत्येक भागासाठी एक शहराध्यक्ष व दोन कार्याध्यक्षांची नियुक्ती केली आहे.

पुणे शहराचे पूर्व पुणे यामध्ये कसबा, कॅन्टोन्मेंट हडपसर व वडगाव शेरी या चार मतदारसंघाला पूर्व पुणे म्हणून संबोधन करून पूर्व पुण्याच्या शहराध्यक्षपदी माजी आमदार सुनील टिंगरे यांची तर कार्याध्यक्षपदी रूपाली ठोंबरे व दुसरे कार्याध्यक्ष म्हणून हाजी फिरोज शेख यांची निवड करण्यात आली आहे. पुणे शहराच्या पश्चिम पुण्यामध्ये पर्वती खडकवासला कोथरूड व शिवाजीनगर या चार विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे. पश्चिम पुण्याच्या शहराध्यक्षपदी सुभाष जगताप यांची निवड तर कार्याध्यक्षपदी प्रदीप देशमुख यांची फेरनिवड व दुसरे कार्याध्यक्ष म्हणून अक्रूर कुदळे यांची निवड करण्यात आली आहे.





या निवडीची घोषणा आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली व या सर्वांची नियुक्तीपत्रे प्रांताध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिलेले आहेत. तसेच अजितदादांच्या सूचनेवरून आमदार चेतन तुपे यांनी ही नावे जाहीर केली.

# शशांक हगवणेचा जेसीबी जप्त, जेसीबी विक्रीच्या नावाखाली केली होती फसवणूक


**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

पोलिसांनी हगवणेचा जेसीबी जप्त केला आहे. प्रशांत येळवंडे यांची शशांक आणि आई लता हगवणेने जेसीबी विक्रीच्या नावाखाली फसवणूक केली होती. ॲडव्हान्स आणि कर्ज फेडण्यासाठी दिलेलं ११ लाख ७० हजार रुपये हगवणेनी परत केले नाहीत. उलट पिस्तूलाचा धाक दाखवून 'आता पैसे मागू नकोस, अन्यथा घरचे नीट राहणार नाहीत.' अशी धमकी दिल्याची तक्रार करण्यात आली होती. हा गुन्हा म्हाळुंगे पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाल्यावर पोलिसांनी हगवणेच्या घरापासून जेसीबी जप्त केला.

शशांक हगवणेचा आणखी एक कारनामा समोर आला आहे. वैष्णवीचा पैशांसाठी छळ करुन आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी हगवणेंना कोर्टाकडून न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. आता शशांक हगवणेने जेसीबी व्यवहारप्रकरणी ११ लाख ७० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप खेड तालुक्यातील प्रशांत येळवंडे यांनी केला आहे. याप्रकरणी महाळुंगे चाकण पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून शशांक आणि त्याच्या आईविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रशांत येळवंडे यांनी तक्रारीत नमूद केले की, लता हगवणे आणि शशांक हगवणे यांच्यासोबत २४ लाखांमध्ये जेसीबीचा व्यवहार ठरला होता. त्यामुळे प्रशांत एळवंडे यांनी शशांकला सुरुवातीला ५ लाख रुपये दिले. तसेच जेसीबीवर १९ लाखांचे कर्ज असल्याने प्रशांत बँकेचे हफ्ते भरण्यासाठी महिन्याला ५० हजार रुपये शशांकला देत होते. मात्र शशांकने हफ्ता भरला नाही, ते पैसे मात्र स्वत:साठी वापरले, त्यामुळे बँकेने जेसीबी जप्त केला. त्यानंतर शशांकने हा जेसीबी सोडवून आणला. मात्र त्यावेळी प्रशांत यांनी दिलेले पैसे परत केले नाहीत आणि जेसीबीचा ताबाही दिला नाही. परतव्याची रक्कम ११ लाख ७० हजार रुपये इतकी आहे. शशांक याने आपल्याला बंदुकीचा धाक दाखवून धमकावले असल्याचा आरोप प्रशांत एळवंडे यांनी केला आहे.

प्रशांत येळवंडे एकदा चर्चा करण्यासाठी गेले तेव्हा शशांकने त्याच्या कमरेला लावलेल्या पिस्तूलवर हात ठेवून प्रशांत यांना धमकी दिली. तू मशीन १४ महिने वापरली आहे, आता पैसे मागू नको, नाही तर घरचे नीट राहणार नाहीत' असे शशांकने धमकावले. वारंवार मागणी करुन आपली जेसीबी परत न मिळाल्याने प्रशांत यांनी पोलिसांत धाव घेतली.

# पुणे महापालिका आयुक्त पदाची नवल किशोर राम यांनी सूत्रे स्वीकारली



**पुणे । प्रतिनिधी**

महापालिका आयुक्त पदाचा पदभार नवल किशोर राम यांनी डॉ. राजेंद्र भोसले यांच्या कडून स्वीकारला. डॉ. राजेंद्र भोसले यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

पुणे महापालिका आयुक्त पदावरून डॉ. राजेंद्र भोसले सेवानिवृत्त झाले आहे. त्यांच्या जागी राज्य शासनाकडून महापालिका आयुक्त म्हणून नवल किशोर राम यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महापालिकेत काम करण्याची उत्तम संधी मिळालेली आहे. त्यामुळे सगळ्यांना बरोबर घेऊन काम करणार असल्याचे नवल किशोर राम यांनी स्पष्ट केले आहे. यावेळी अतिरिक्त महापालिका आयुक्त, उपआयुक्त व खातेप्रमुख उपस्थित होते.

# 'विघ्नहर'च्या योजनांचा लाभ घ्या-सत्यशील शेरकर

**नारायणगाव । प्रतिनिधी**

**विघ्नहर सहकारी साखर कारखान्याच्या ऊस विकास योजनांचा लाभ घेऊन जास्तीत जास्त ऊस कारखान्याकडे नोंदवावा. गाळप हंगामात कारखान्यालाच प्राधान्याने ऊस द्यावा, असे आवाहन कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर यांनी केले आहे.**



कारखान्यामार्फत मोफत माती परीक्षण करून दिले जाते. चालू लागवड हंगामापासून विघ्नहर कृषी अमृत हे सेंद्रीय खत ५० किलो बॅग पॅकिंगमध्ये माफक दरात उपलब्ध करून दिले जाणार असल्याची माहिती शेरकर यांनी दिली. कारखान्यामार्फत लागवड हंगाम २००३-०४ पासून हुमणी किडीचा प्रादुर्भाव टाळणेसाठी शेतकरी व मजुरांकडून रोख रक्कम प्रतिकिलो २०० रुपये देऊन हुमणी किडीचे भुंगेरे गोळा करून कारखाना गट ऑफिसला जमा करून कारखाना साईटवर नष्ट केले जातात. सर्व ऊस उत्पादक शेतकर्यांनी लागवड हंगाम २०२५-२६ मध्ये २६ मे ते ३० जून २०२५ या कालावधीत हुमणी किडीचे भुंगेरे गोळा करून कारखाना गट ऑफिसला जमा करावेत, असे आवाहन शेरकर यांनी केले आहे शेतकर्यांना ऊस पिकातील नवनवीन संशोधित तंत्रज्ञान व ऊस पिकामध्ये यांत्रिकीकरणाच्या वापराची माहिती होणेसाठी कारखाना खर्चाने व्हीएसआय आयोजित ज्ञानयाग व ज्ञानलक्ष्मी प्रशिक्षण कार्यक्रमासाठी पाठविले जाते.

तसेच ऊस उत्पादक शेतकर्यांमध्ये एकरी जास्तीत जास्त ऊस उत्पादन घेणेची भावना वृध्दींगत होणेसाठी एकरी १०० ते ११० टन ऊस उत्पादन घेणारे शेतकरी तसेच एकरी १११ व त्यापुढे ऊस उत्पादन घेणार्या शेतकर्यांना प्रशस्तीपत्रक, सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन गौरविणेत येते. व्हीएसआयमार्फत देण्यात येणार्या ऊसभूषण पुरस्कारासाठी कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकर्यांचा सहभाग नोंदविण्यात येतो. आजवर कारखान्याच्या ५ ऊस उत्पादक शेतकर्यांना पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

# पुणे अपघात प्रकरण! कार चालकाची येरवडा कारागृहात रवानगी, आरोपी विरोधात सर्व पुरावे न्यायालयासमोर

**पुणे । प्रतिनिधी**

**पुण्यातील सदाशिव पेठ अपघात प्रकरणी महत्वाची अपडेट समोर आली आहे. कारचा चालक जयराम मुळे (गरळीरा चींश्रश) याची येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. आरोपी चालकाला आज पुणे न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. यावेळी पोलिसांनी आरोपीच्या विरोधात सर्व पुरावे न्यायालयाच्या समोर मांडले होते. आरोपीकडे वाहन चालवण्याचा परवाना सुद्धा नव्हता असे असताना त्याने वाहन चालवण्याचे धाडस केले आणि यातून हा अपघात घडल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.**



दरम्यान, सर्व तांत्रिक पुराव्यासह साक्षीदारांच्या माहितीच्या आधारे पोलिसांनी न्यायालयाला माहिती दिली आहे. दारुच्या नशेत जयराम मुळे याने काल चहा पिण्यासाठी थांबलेल्या १२ जणांना उडवले होते. यामध्ये विद्यार्थी गंभीर जखमी झाले आहेत.

पुणे शहरातील सदाशिव पेठ परिसरात भावे हायस्कूल जवळ चहा प्यायला आलेल्या एमपीएससीच्या १२ विद्यार्थ्यांना एका कार चालकाने उडवल्याची घटना घडली. हा कार चालक दारु पिऊन कार चालवत होता हे समोर आलं आहे. दारु पिऊन कार चालवणाऱ्या ड्रायव्हरला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. यातील जखमी विद्यार्थ्यांवर उपचार सुरु आहेत. शनिवारी संध्याकाळी पुण्यातील भावे हायस्कूलजवळ ही घटना घडली. या अपघातात तीन जण गंभीर जखमी झाले. तर नऊ विद्यार्थी किरकोळ जखमी झाले आहेत. सर्व जखमींवर संचेती आणि मोडक हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

पुण्यातील भावे हायस्कूलचा परिसर म्हणजे अरुंद रस्ते आणि छोटी गल्ली असलेला परिसर आहे. असं असतानाही कार चालक भरधाव वेगाने आला. त्यामुळे त्याचे कारवरील नियंत्रण सुटलं आणि समोर चहा पित असलेल्या विद्यार्थ्यांना त्याने उडवलं. जखमींमध्ये तीन मुलीही असल्याची माहिती आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे. घटनेची माहिती मिळताच त्या ठिकाणी वरिष्ठ अधिकारी आणि स्थानिक आमदार हेमंत रासणे उपस्थित राहिले. हेमंत रासणे यांनी मुख्यमंत्र्यांना या घटनेची माहिती दिली. या सर्व विद्यार्थ्यांवर तातडीने उपचार करण्यात यावेत असा आदेश मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. यांचा जो काही खर्च असेल तो शासन करणार आहे. दरम्यान, अपघातानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जखमी विद्यार्थ्यांशी संवाद साधला आहे. युवा सेनेच्या नेत्या शर्मिला येवले यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विद्यार्थ्यांशी बातचीत करुन दिली. जी मदत लागेल ती आम्ही करु असे आश्वासन देखील एकनाथ शिंदे यांनी विद्यार्थ्यांना दिलं आहे.

# सहायक आयुक्तांचे अधिकार्यांना खडेबोल; कामात हलगर्जीपणा केल्यास कारवाईचा इशारा

**बाणेर । प्रतिनिधी**

पावसाळ्यात होणार्या दुर्घटना टाळण्यासाठी अभियंते आणि कर्मचार्यांनी कामात कुचराई केल्यास त्यांच्यावर कारवाईचा बडगा उचलला जाईल, असा इशारा औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त गिरीश दापकेकर यांनी दिला.

क्षेत्रीय कार्यालयात झालेल्या मोहल्ला कमिटीच्या बैठकीत नागरिकांनी विविध समस्यांचा पाढा वाचला. याबाबत दापकेकर यांनी संबंधित अधिकार्यांना फैलावर घेतले.

या बैठकीला विविध विभागाच्या अधिकार्यांसह बालेवाडी वेल्फेअर फेडरेशनचे शकिल सलाती, एस. ओ. माशाळकर, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. प्रीती काळे, सुनिता निजामपूरकर, शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे नाना वाळके, यार्दीच्या मीनल धारगावे, वसंत जुनवणे, रितेश निकाळजे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बालेवाडीतील रणभूमीजवळील ड्रेनेजची समस्या, साई सिलीकॉन सोसायटीजवळ तुंबणारे पावसाचे पाण्यामुळे रहिवाशांची होणारी गैरसोय, राधा चौकात बंद बसलेले पथदिवे, अमर टेक पार्कजवळ एसटीपी प्रकल्प बंद असल्याने वाहणारे दुर्गंधीयुक्त पाणी, बीटवाईज चौकातील सांडपाणी, पुराणीक सोसायटीचे रस्त्यावर येणारे सांडपाणी, बोपोडीतील मानाजी बाग येथील तुंबलेले चेंबर आदींसह विविध समस्या नागरिकांनी या वेळी मांडल्या.



तसेच महाळुंगेतील अनधिकृत बाजारावर कारवाई करण्याची मागणीही या वेळी करण्यात आली. सार्वजनिक बांधकाम विभागाने सूस रस्त्यावरील बांधलेले स्वच्छतागृह अजूनही सुरू झाले नसल्याचे नागरिकांनी या प्रसंगी सांगितले. बाणेर येथील कचरा वर्गीकरण शेडमध्ये विद्युत दिवे, पंखे बसवण्यासह ज्युडीओजवळील वीजेच्या डीपीचा धोका, तसेच बोपोडी येथील स्वच्छतागृहाच्या दुरवस्थेबाबतही नागरिकांनी या वेळी समस्या मांडली.

एखादी दुर्घटना घडली, तर संबंधित खात्याच्या प्रमुखावर गुन्हा दाखल करण्यात येईल, याची गांभीर्याने दखल घ्यावी, असेही या वेळी सहायक आयुक्त दापकेकर यांनी अधिकार्यांना सुनावले.

बाणेर-बालेवाडी क्षेत्रीय कार्यालयांतर्गत अनेक ठिकाणी नागरी सुविधांच्या अभावामुळे होणार्या गैरसोयीबाबत नागरिकांनी या वेळी व्यथा मांडल्या. विशेष करुन तुंबलेल्या सांडपाणी वाहिनी, पथदिवे, वीजेच्या समस्या, रस्ता दुरुस्ती आणि कचर्याच्या प्रश्नावर नागरिकांनी तक्रारी मांडल्या. या तक्रारी तातडीने सोडवून अहवाल सादर करण्याचे आदेश सहायक आयुक्त दापकेकर यांनी संबंधित अधिकार्यांना दिले.